cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२०३ | शुक्रवार, दि.१५ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

realme SAMSUNG oppo vivo ONEPLUS iPhone mi Redmi
BAJAJ FINSERV TVS CREDIT
**महेश मोबाईल शॉपी**
शाखा नं.१ : तळमजला, गाळा नं.५ सारडा संकुल, डी.पी.रोड, बीड. मो.8888271054, 9145271054
शाखा नं.२ : सराटे कॉम्प्लेक्स, जातेगाव ता.गेवराई, जि.बीड. मो.8698570254, 8317232508

## संपादकीय

### कटेंगे–बटेंगेची भाषा सत्तेसाठीच...

सध्या राज्यात निवडणुकीचे वातावरण तापलेले असून, त्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांचे जाहीरनामा, वचननामा, संकल्प पत्र, महाराष्ट्रनामा अशा विभिन्न नावांनी पक्षांच्या भूमिका प्रसिद्ध झाल्या आहेत. यातून एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक राजकीय पक्ष भावनिक राजकारण करत स्वत:ची पोळी भाजून घेण्याच्या प्रयत्नात आहे. जातीचे, धर्माचे राजकारण करून लोकांना फसवायचे, त्यांची डोकी भडकवायची असे राजकारण सुरू आहे. जाहीरनाम्यातून वारेमाप आश्वासनांची खैरात केली जाते.

# सत्ता द्या, ३ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करू

## राहुल गांधींची ग्वाही;दौऱ्याआधी शेतकऱ्यांशी साधला ऑनलाईन संवाद

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्राच्या दौऱ्याआधी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे राज्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेताना सत्ता आमच्या महाविकास आघाडीकडे द्या, आम्ही ३ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करू, अशी ग्वाही दिली. याबाबतचा एक व्हिडिओ त्यांनी गुरुवारी (दि.१४) आपल्या ट्विटर हँडलवर पोस्ट केला आहे.**

राहुल गांधी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना केंद्रातील भाजप सरकारने आणि राज्यातील महायुतीने शेतकऱ्यांचे मोठे नकसान केले आहे. सत्तेवर येताना अनेक आश्वासने दिली. मात्र ती पूर्ण केली गेली नाहीत, अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे. यावेळी शेतकऱ्याने एका एकरात ६ क्विंटल सोयाबीनचे उत्पादन झाले असून सध्य स्थितीत ३००० हजार भाव मिळत आहे. तर उत्पादन खर्च २३ ते २४



हजार झाला आहे. आता सोयाबीन विकल्यास १८ हजार रूपये येतील. म्हणजेच ६ हजार रूपयांचे नुकसान आहे. यामुळे अशावेळी आम्ही आमच्या मुलाबाळांचे कसे संगोपन करायचे? त्यांच्या पोटाला काय घालायचे? असा सवाल करताना व्यथा मांडली. केंद्र सरकारने सोयाबीनला हमीभाव ४ हजार ८०० दिला आहे. पण हमीवावर खरेदी कोणीच करत नाही. यावरून राहुल गांधी यांनी कागदावर सत्य असून ते सत्यात नसल्या सारखे असल्याचा टोला भाजपला लगावला आहे. यावेळी एका शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलेने देखील आपली समस्या राहुल गांधी यांना सांगितली. कर्जामुळे तिच्या पतीने आत्महत्या केली असून फक्त ३ लाखांच्या कर्जापोटी त्याला टोकाचे पाऊल उचलावे लागल्याचे सांगितले. आता त्या कर्जाचे ७ ते ८ लाख झाले असून मुलाबाळांचा सांभाळ करणे कठिण झाल्याचेही ती महिला म्हणाली. यावेळी राहुल गांधी यांनी, मविआ असो किंवा इंडिया आघाडी सत्तेत आल्यास त्यांच्याकडे शेतकऱ्यांची काय अपेक्षा आहे अशी विचारणा केली. यावर शेतकऱ्यांनी कर्जमाफी

पान २ वर

### २५ कोट्याधिशांचे १६ लाख कोटी माफ

देशातील भाजप सरकारने फक्त २० ते २५ कोट्याधिशांचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केलें. पण शेतकऱ्यांचा नवा पैसा माफ केला नाही. यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतमाल, सोयाबीन, धान आणि कापसाला हमीभाव मिळायला हवा अशा आमची इच्छा आहे. यामुळे राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांना ३ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याची ग्वाही राहुल गांधी यांनी यावेळी दिली.

## स्व.मुंडे साहेबांपासून प्रत्येक निवडणुकीच्या विजयाची नांदी उजनी पाटी येथील सभा ठरायची-धनंजय मुंडे

### वैद्यनाथ कारखाना सुरू करून माझ्या भावाला गिफ्ट देत आहे –आ.पंकजा मुंडे



**परळी वै. । प्रतिनिधी**

**स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांनी स्वत: पट्टीवडगाव जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढली. २००२ साली या गटातून मीही लढलो; थोडक्यात सांगायचे झाले तर स्वर्गीय मुंडे साहेबांपासून प्रत्येक निवडणुकीच्या विजयाची नांदी ही उजनी पाटी येथील जाहीर सभा ठरायची. ही गेल्या अनेक वर्षांची परंपरा आहे व ही परंपरा आताही अबाधित राहील असा विश्वास धनंजय मुंडे यांनी उजनी पाटी येथे आयोजित भव्य जाहीर सभेस संबोधित करताना व्यक्त केला.**

धनंजय मुंडे यांच्यासह भाजप नेत्या आमदार पंकजाताई मुंडे, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, माजी खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे, माजी आमदार संजय भाऊ दौंड यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत अंबाजोगाई तालुक्यातील उजनी पाटी येथे धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या मातीतील माणसाची सेवा व विकास करण्याचे वचन मुंडे कुटुंब दोन पिढ्यांपासून निभावत आहे व पुढेही कायम निभावत राहील. प्रत्येक निवडणुकीत या भागातील जनतेने आमच्या पाठीशी मोठा जन आशीर्वाद उभा केलेला आहे, त्याची परतफेड आम्ही मुंडे कुटुंबीय कधीही करू शकत नाहीत. मात्र तरीही इथल्या प्रत्येक माणसाच्या प्रगती आणि आर्थिक उन्नती मध्ये

पान २ वर

# मुंदडांना ओबीसी द्वेष भोवणार वंजारी समाज साथ सोडणार?

## पृथ्वीराज साठे यांच्याकडे ओबीसीतील बहुतांश नेते वळले









**बीड । प्रतिनिधी**

**केज विधानसभा मतदारसंघांमध्ये आता आमदार नमिता मुंदडा यांना ओबीसी द्वेष भोवणार असून ओबीसी मधील अनेक नेते सध्या महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या संपर्कात असल्याची जोरदार चर्चा आहे. तर दुसरीकडे वंजारी समाज सुद्धा मुंदडा यांची साथ सोडणार असल्याचे बोलले जात आहे.**

केज विधानसभा मतदारसंघांमध्ये दुरंगी लढत होणार असून महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांना ही निवडणूक जड जाणार असल्याचे चिन्ह आहेत. ओबीसी समाजाच्या मतांवर डोळा ठेवून असलेल्या मुंदडा यांना आता ओबीसीच धडा शिकवणार असल्याचे बोलले जात आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये मुंदडा यांनी केज मतदार संघामध्ये ओबीसी द्वेष ठेवून काम

पान २ वर

### कार्यकर्ता आडवा आणि कार्यकर्ता जिरवा, मुंदडांना पराभूत करणार?

गेल्या पाच वर्षांमध्ये मुंदडा यांनी केज विधानसभा मतदारसंघांमध्ये विकास काम करताना प्रत्येक गावामध्ये कार्यकर्ता आडवा आणि कार्यकर्ता जिरवा हे मिशन राबवल्याचे बोलले जात आहे. एखाद्या कार्यकर्त्याने मुंदडा यांना डावलून निधी आणला तर त्या कार्यकर्त्याचे कामे कशी अडवली जातील आणि तो कार्यकर्ता कसा जिरवला जाईल याकडेच लक्ष दिलं गेल्या असल्याचा आरोप बऱ्याच कार्यकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे मुंदडा यांनी राबवलेल्या कार्यकर्ता आडवा आणि कार्यकर्ता जिरवा, या मिशन मुळे नमिता मुद्रा यांचा यावेळी मोठ्या फरकाने पराभव होऊ शकतो, अशी आता गावागावात चर्चा रंगली आहे.

## निवडणुकीमुळे राज्यातील शाळांना तीन दिवस सुटी?

पुणे : राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या अनुषंगाने १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे शाळा भरविणे शक्य नसल्यास शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना देण्याचे निर्देश शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांना दिले आहेत. दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेतील कामकाज आणि प्रत्यक्ष मतदानाच्या प्रक्रियेत शिक्षकांचा

पान २ वर

# धोंडे साहेब बोलतच नाहीत मतदान करायचं कसं?

## सर्वसामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न; ओबीसी समाज सुद्धा पडला संभ्रमात

**बीड । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये ओबीसी आमदार होण्याची शंभर टक्के संधी असताना सुद्धा धोंडे साहेब बोलतच नाहीत, त्यामुळे त्यांना आम्ही मतदान करायचं कसं? असा प्रश्न आता ओबीसी समाज बांधव उपस्थित करत आहेत. त्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्य नागरिकाबरोबरच ओबीसी समाज सुद्धा मतदान करायचं कोणाला या संभ्रमात आहे. आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघ हा ओबीसी आणि मराठा समाज यांची समसमान ताकद असलेला मतदार संघ आहे. विधानसभा निवडणुकीसह लोकसभा

पान २ वर



### ओबीसी समाजही सोयीचं राजकारण करणार

आष्टी मतदार संघामध्ये ओबीसी समाज मोठ्या संख्येने आहे. मात्र सक्षम असा ओबीसी नेता नसल्याने मतदार संघातील माजी मंत्री व भाजपचे उमेदवार सुरेश धस, अजित पवार गटाचे उमेदवार आमदार बाळासाहेब आजबे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार शेख महबूब यांच्याकडे कमी जास्त प्रमाणामध्ये ओबीसी समाज वळण्याची शक्यता आहे. एकंदरीत सक्षम नेता नसल्याने आष्टी मतदारसंघातील ओबीसी समाज सोयीनुसार राजकारण करणार असल्याचे बोलले जात आहे.

## मुंडे बहिण-भावाच्या पाठबळाने डॉ.योगेश क्षीरसागर यांची विजयाकडे वाटचाल



**बीड । प्रतिनिधी**

**बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री धनंजय मुंडे यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ बीडमध्ये भव्य सभा पार पडली. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उमेदवारीपासून ते चुलते माजी मंत्री जयदत्तआण्णा यांच्या पाठिंब्यापर्यंत अनेक योगायोग जुळून आले. या काळात मुंडे बहीण भावाचे मिळालेले पाठबळ, कालच्या सभेपूर्वी राष्ट्रवादीतील मिटलेला अंतर्गत कलह यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर यांची विजयाच्या दिशेने वाटचाल दिसत आहे.**

अजितदादा पवारांच्या उपस्थितीत अनेक मोठे प्रवेश झाले. यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर यांची ताकद नक्कीच वाढली आहे. डॉ.योगेश यांना सर्व समाजातून पाठिंबा मिळत आहे. अनेक संघटना देखील त्यांना पाठिंबा देत आहेत. डॉ.योगेश यांच्यासाठी

पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | ३,२०० | ३,२०० | ३,२०० |
| ज्वारी/हायब्रिड: ५८.०० क्विंटल | २,१०१ | २,८६५ | २,३०५ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद :४४.०० क्विंटल | ४,७४० | ७,७०० | ६,८७१ |
| बाजरी: ५१.५० क्विंटल | २,३०१ | ३,०६१ | २,७६३ |
| मुग : १.५० क्विंटल | ६,९५० | ७,२५१ | ७,१०० |
| सोयाबीन: ३७१.५० क्विंटल | ३,४०१ | ४,२२० | ३,९९२ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |

**दहाडने वाला एक वो टायगर; खेल पलटने वाला है,अब ना रूकेगा सुरेश धस जनता का रखवाला है , क्योकी माहोल बदलने वाला है!**

# आष्टी मतदार संघात गावागावातील प्रचारात एकच नारा

## गुरुवारी पाटोदा तालुक्यातील गावात सुरेश धस यांचा झंझावात

आष्टी । प्रतिनिधी

मतदार संघातील जनतेच्या अडीअडचणीला अर्ध्या रात्री धावून जाऊन मदतीचा हात पढे करणारा नेते वंचित घटकासाठी अहोरात्र झटणाऱ्या २४ तास ३६५ दिवस जनसेवेसाठी कार्य तत्पर सुरेश धस यांना मोठ्या प्रमाणावर वाढता प्रतिसाद मिळत असून दहानेवाला एक वो टायगर; खेल पलटने वाला है,अब ना रूकेगा सुरेश आण्णा धस जनता का रखवाला है , क्योकी माहोल बदलने वाला है,परिवर्तन होने वाला है!हा एकच नारा घुमत आहे.

२३१ आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी ,शिवसेना,रिपाई व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार सुरेश रामचंद्र धस हे कमळ या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. यावेळी गाव दौऱ्यात मतदारांना संवाद साधताना सुरेश धस म्हणाले, विरोधक निवडणूकीपूरते आश्वासन देत आहेत. त्यांच्या थुलतापांना बळी पडू नका कारण हे फक्त निवडणुकीपुरतेच तुमच्या दारात येत आहे.२४ तास ३६५ दिवस मी तुमच्या सेवेत असून माझे धस कुटुंब देखील आपल्या सुखदु:खात सहभागी होत आहे. २०१४ आणि २०१९ ला जे लोकप्रतिनिधी निवडून आले होते ते कधी तुमच्या बेदरवाडीत त्यांच्या पाच वर्षांच्या काळात कधी आले होते का त्यांना त्या काळात ही वाडी माहिती झाली का.तुम्ही पाच वर्षांच्या काळात या भागात तुम्ही काय विकास केला आहे हे सुद्धा नागरिकांना माहिती नाही.येणाऱ्या काळात शेततलाव ही योजना या भागात प्रभावी राबविली तर येणाऱ्या काळात शेतकऱ्यांचे जीवमान बदल्यासाठी मोठ्या प्रमाणावर साथ मिळेल.बेरोजगार तरुणांसाठी अनेक प्रभावी योजना राबवण्याचा माझा मानस असून त्यांच्या हाताला रोजगार मिळण्यासाठी व सर्व बाबी सुधारण्यासाठी मी प्रयत्नशील असणारा असून यासाठी मला साथ व समर्थन द्या. मी व माझं धस कुटुंब आपल्या साठी प्रयत्नशील राहील आणि प्रशासनात माझी चांगली पकड असल्याने मी आपल्या पर्यत सर्व सरकारी योजना राबविल अशी ग्वाही धस यांनी बोलताना मतदारांना दिली.त्यामुळे येणाऱ्या २० तारखेला अनुक्रमांक ३ चिन्ह कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून मला प्रचंड मताने विजयी करण्यासाठी मी आपल्या गावात आलो असल्याची विनंती भाजपा उमेदवार सुरेश धस यांनी केली.



गेल्या अनेक वर्षांपासून जनतेची सेवा करत आहेत.लोकांच्या सुखदु:खात तसेच अडीअडचणीला धावून जातात.तसेच शेतकरी हिताचे निर्णय शासनस्तरावर पाठपुराव्याने मार्गी लावतात.त्यामुळे आता आष्टी मतदारसंघातील जनतेचा त्यांना मोठ्या प्रमाणावर वाढता पाठिंबा मिळत आहे.मतदानरूपी आशिर्वाद देऊन चिन्ह कमळ ,अनुक्रम ३ समोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# कटेंगे – बटेंगेची भाषा सत्तेसाठीच...

सध्या राज्यात निवडणुकीचे वातावरण तापलेले असून, त्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांचे जाहीरनामा, वचननामा, संकल्प पत्र, महाराष्ट्रनामा अशा विभिन्न नावांनी पक्षांच्या भूमिका प्रसिद्ध झाल्या आहेत. यातून एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक राजकीय पक्ष भावनिक राजकारण करत स्वत:ची पोळी भाजून घेण्याच्या प्रयत्नात आहे. जातीचे, धर्माचे राजकारण करून लोकांना फसवायचे, त्यांची डोकी भडकवायची असे राजकारण सुरू आहे. जाहीरनाम्यातून वारेमाप आश्वासनांची खैरात केली जाते. आश्वासने पूर्ण करायची नसतात, निवडणूक जिंकण्यासाठी ती करायची असतात. निवडणूक झाल्यावर राजकारणी जाहीरनामे विसरतात तसेच लोकही विसरतात.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटली तरी 'बटेंगे तो कटेंगे', 'एक है तो सेफ है' अशा घोषणा होताना दिसतात. सत्तापिपासू वृत्तीचे राजकारणी येनकेन प्रकारे सत्ता काबीज करण्यासाठी आतूर असतात. महागाईने जनता हैराण आहे, रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. ग्रामीण भागात आरोग्य सेवेचा अभाव आहे, गोरगरिबांना शिक्षण महाग झाले आहे, तरुणांच्या हाताला काम नाही, शेतकऱ्यांच्या आत्महत्या आजही कमी होताना दिसत नाहीत, अशा प्रकारचे कितीतरी प्रश्न आ वासून उभे आहेत परंतु राजकारण्यांचे त्याकडे लक्ष नाही. त्यांना आपला मान-सन्मान, इगो महत्त्वाचा वाटतो. जनताही जात-धर्माच्या भावनिक प्रश्नांवर एकत्र येताना दिसते पण महागाई, शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी, पर्यावरण या मूलभूत प्रश्नांसाठी एकत्र येताना दिसत नाही ही गंभीर बाब आहे. निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने वेगवेगळे वाद निर्माण केले जात आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले 'बटेंगे तो कटेंगे'. पंतप्रधान मोदी म्हणाले 'एक है तो सेफ है' अशा वक्तव्यांवरून पंतप्रधानपदावरील व्यक्ती जनतेत संभ्रम निर्माण करते असा अर्थ काढायचा का? पंतप्रधान आणि सरकार भारतीय जनतेचे संरक्षण करण्यास सक्षम नाहीत का? शिवाय कोणाला कोणापासून धोका आहे ते नाव घेऊन का सांगत नाहीत? कोण एकत्र राहिले नाही तर कोण त्यांना काटणार आहे ते सांगायला का घाबरता? राम मंदिराचे श्रेय घेऊ पाहणारे डिसेंबर ९२ मध्ये बाबरी मशीद पाडली गेली तेव्हा कायद्याचे प्रश्न निर्माण झाले तेव्हा कारवाईच्या भीतीने लपून बसले होते. त्यावेळी अजिबात न भीता बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीरपणे ती जबाबदारी स्वीकारली होती.

मशीद पाडली गेली म्हणून राम मंदिर उभे राहिले. त्यामुळे राम मंदिर उभारणीचे खरे श्रेय बाळासाहेब ठाकरे यांचेच आहे. बाबरी मशीद पतनानंतर मुंबईत जी दंगल उसळली तेव्हा शिवसेनेनेच मुंबई वाचवली होती. त्यावेळी 'बटेंगे तो कटेंगे', 'एक है तो सेफ है', म्हणणाऱ्यांच्या उद्योगधंद्यांना शिवसेनेनेच संरक्षण दिले होते.लोकसभेला दिलेल्या गॅरंट्यांचे फुगे हवेत विरले आहेत. मोफतच्या गॅरंट्या देशाला व राज्यांना कर्जबाजारी करून कंगाल बनवतात हे मतदारांच्या लक्षात आले आहेच. निवडणूक काळापुरते हजारो हातांना काम मिळाले आहे. अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. एवढे मात्र खरे. खानावळीवर गर्दी वाढली आहे. कार्यकर्त्यांना खुश करण्यासाठी जेवणावळी उठत आहेत. मंडपवाले, बँडवाले यांची चलती आहे आणि क्षणिक बाबीला जनता भुलून जाताना दिसत आहे. मुलभूत प्रश्नांची उत्तरे सत्ताधाऱ्यांकडे नाहीत. जनतेला आता पोकळ आश्वासाने नको आहेत. केंद्र आणि राज्य सरकारने घोषणांचा नुसता पाऊस पाडला मात्र प्रत्यक्षात काम झाले नाही. आता हे करू ते करू असे बोलले जात आहे मग आत पर्यंत सत्ता असताना का केले नाही असा प्रश्न आपोआपच निर्माण झाला आहे. वाढलेली महागाई, बेरोजगारी यावर सत्ताधारी बोलत नाहीत कारण त्यावर बोलल्यास तेच उघडे पडणार आहेत. हे झाकण्यासाठीच मग बटेंगे ची भाषा वापरली जात आहे.

# महायुतीकडून जातीय ध्रुवीकरणाचे प्रयत्न–आ.अमित देशमुख

**जालना । प्रतिनिधी**

**सत्तेचा दुरुपयोग करून पक्ष फोडाफोडीचे राजकरण करणाऱ्या महायुतीची नेते मंडळी पुढे सत्ता येणार नाही, या भीतीने जातीय ध्रुवीकरणाचे प्रयास करीत असून कोणत्याही भुलथापांना बळी न पडता जनतेने जालनेकरांच्या भवितव्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल यांना भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी आज येथे केले. आमदार कैलास गोरंट्याल व आपण स्वत: निश्चितपणे विजयाचा चौकार मारणार असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.**

जालना विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारार्थ जालना शहरातील सुयेशा लॉन्स येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी विचारपिठावर खासदार डॉ. कल्याण काळे, उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल, जालना लोकसभेचे पक्षनिरिक्षक डॉ. पी. सी. शर्मा, पक्षनिरिक्षक नामदेव पवार, आमदार राजेश राठोड, जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र राख ,माजी आमदार संतोष सांबरे, काँग्रेसचे प्रदेश सचिव कल्याण दळे,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, शिवसेनेचे शहरप्रमुख बाला परदेशी, रिपाइंचे ( गवई गट) जिल्हाध्यक्ष किशोर मघाडे, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे,महिला काँग्रेसच्या अध्यक्षा नंदा पवार,मुरलीधर शेजूळ, शिवाजी शेजूळ, प्रभाकर पवार, काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष बदर चाऊस,कल्याण बोराडे, बाबुरावमामा सतकर, राम कुराडे,अ‍ॅड.सय्यद तारेख आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आमदार देशमुख पुढे म्हणाले की, आमदार कैलास गोरंट्याल हे मराठवाड्यातील काँग्रेस पक्षाचे सर्वात सिनियर आमदार आहेत, आपण व आमदार कैलास गोरंट्याल हे चौथ्यांदा विजयी चौकार लगावणार आहोत. आमदार गोरंट्याल हे विधिमंडळात काँग्रेस पक्षाचे स्टार आमदार म्हणून ओळखले जातात, विकास व जनकल्याणाची तळमळ असलेले आमदार म्हणून ते ओळखले जातात.पिण्याच्या पाण्यासाठी शहरात घागर मोर्चे, पाणी भरण्यासाठी लागलेल्या रांगा हे चित्र बदलून टाकण्यासाठी आमदार गोरंट्याल यांनी संघर्ष केला व जायकवाडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करून घेतली. जालना शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यासाठी आमदार गोरंट्याल यांनी पुढाकार घेतला, आपण वैद्यकीय शिक्षण मंत्री असतांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा तसेच आवश्यक त्या परवानग्या काढून दिल्या, त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय महाविकास आघाडीच्या काळातच मंजूर



झाले.आता पुढे येणाऱ्या महाविकास आघाडीच्या कार्यकाळातच वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन होईल. सत्तेचा दुरुपयोग करून पक्ष फोडाफोडीचे राजकरण करणाऱ्या महायुती व घटक पक्षांची नेते मंडळी जाती- धर्माचे राजकरण करून जातीय ध्रुवीकरणाचे प्रयास करीत आहेत. जनतेने त्यांच्या भुलथापांना बळी पडू नये, महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येणार ही काळ्या दगडावरील रेष आहे, दिनांक २५ नोव्हेंबर रोजी महाविकास आघाडी राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जालना शहराच्या भवितव्यासाठी तसेच जालना शहराच्या सुवर्णकाळासाठी सतत विकासाचा ध्यास असलेले आमदार कैलास गोरंट्याल यांना आमदार नव्हे तर मंत्री होण्यासाठी भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन करुन काँग्रेस पक्षाचे नेते राहूल गांधी यांच्या महाविकास आघाडीसाठी निर्माण करण्यात आलेल्या पंचसूत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलतांना खासदार डॉ. कल्याण काळे यांनी विकासाचा ध्यास असलेले कर्तव्यनिष्ठ आमदार कैलास गोरंट्याल हे कार्यकर्त्यांसाठी कुठेही भिडणारे नेते आहेत, जालना शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजुरीसाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे, महाराष्ट्र राज्यात महाविकास आघाडीचे सरकार निश्चितपणे येणार आहे, या सरकारमध्ये आमदार कैलास गोरंट्याल हे मंत्री म्हणून दिसणार आहेत, विकासाचा ध्यास असलेले आमदार कैलास गोरंट्याल यांना जनतेने पुन्हा एकदा निवडून द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जालना विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल यावेळी बोलतांना म्हणाले की, जालना शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कारखाना झाले आहे, आमदार अमित देशमुख हे वैद्यकीय शिक्षणमंत्री असतांना आपण व आमदार अमित झणक यांनी त्यांच्याकडे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी देण्याची विनंती केली होती, तेंव्हा देशमुख यांनी जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी देवून ते स्वतः हेलिकॉप्टरने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची जागा बघण्यासाठी जालना शहरात आले होते, शासकीय वैद्यकीय महाविद्याल मंजूर व्हावे, यासाठी आपण विधानसभेच्या आवारात उपोषणाला बसलो. जालना शहरात मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे खरे श्रेय हे आमदार अमित देशमुख यांनाच आहे, इतर कुणीही याचे श्रेय वाटण्याचा प्रयत्न करता कामा नये. लातूर व जालना जिल्ह्याची निर्मिती एकाच वेळी झाली, लातूर जिल्ह्याला विलासराव देशमुख यांच्या सारखे दमदार नेतृत्व लाभल्याने लातूरचा विकास झाला. याउलट जालन्याचे झाले, १९९० पासून आमदार व दोन वेळा मंत्री राहिलेले खोतकर यांनी शहर विकासाच्या कोणत्याही योजना आणल्या नाहीत, उलट रामनगर साखर कारखाना, लालबाग जिनिंग, देखरेख संघ, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून स्वतःचा फायदा करून घेतला. जालना शहरासाठी आपण संघर्ष करून जायकवाडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करून घेतली, आता जालना शहरात नवीन जलकुंभ व जलवाहिनीचे कार्य हाती घेण्यात आले आहे, हे कार्य पूर्ण झाल्यावर जालनेकरांना दररोज पाणी पुरवठा केला जाईल. हातवन बृहत प्रकल्प कार्यान्वित करून त्याचे पाणी जालना शहरात आणले गेले तर जालना शहराला मुबलक पाणी मिळेल, याशिवाय खडकपूर्णा धरणातून ७२ गावांना पाणीपुरवठा झाला तर या गावातील पाणी प्रश्न सुटेल. जालना शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे, अशी मागणी करत आपणास जनतेने भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहनही आमदार गोरंट्याल यांनी यावेळी केले. यावेळी राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख, नामदेव पवार डॉ. पी. सी. शर्मा आदींनी जालना शहराच्या विकासासाठी आमदार कैलास गोरंट्याल यांना निवडून द्यावे, असे आवाहन केले. सभेचे संचालन राम सावंत यांनी केले तर दिनकर घेवंदे यांनी आभार मानले. या जाहीर सभेस अकबरखाँ बनेखॉ,मधुकर घेवंदे,विजय चौधरी,दुर्गेश काठोठीवाले, विजय पवार, मनकर्णाबाई डांगे, विनोद यादव यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते , महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सर्व मराठा सेवकांचे ठरले...आता फक्त अनिल दादा आणि दादाच

## एकमुखी निर्णय घेत बीड विधानसभेत जगतापांना दिला पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना सर्व मराठा सेवक आणि सकल मराठा समाजाने एकमुखी पाठिंबा दिला. आता फक्त अनिलदादाच असा नारा देत जगताप यांना निवडून देण्याचा निर्धार केला आहे. यामुळे अवघ्या राज्याचे लक्ष लागलेल्या बीड मतदारसंघातील निवडणुकीचे समिकरण बदलणार असून अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांचा विजय निश्चित मानला जात आहे.**

बीड विधानसभा निवडणुकीत अनिल जगताप यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. मात्र जरांगे कुणाला पाठींबा देतात का याकडे लक्ष होते. आपण थेट कुणाला पाठींबा देणार नाही असे मनोज जरांगेंनी स्पष्ट केले



असले तरी अप्रत्यक्षपणे जरांगेंची भूमीका काय असेल याकडेही लक्ष होतेच. बीड मतदारसंघात कोणाला पाठिंबा द्यायाचा या विषयी जरांगे पाटील यांनी मराठा समाजावर निर्णय सोपविला होता. दरम्यान गुरुवारी सर्व मराठा सेवक आणि सकल मराठा समाजाने एकमुखी निर्णय घेत अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना पाठिंबा दिला. एवढेच नाही तर आता फक्त अनिलदादाच असा नारा देत त्यांना मोठा मताधिक्याने निवडून आणत विधानसभेत पाठिवण्याचा निर्धारही केला. यामुळे बीड मतदारसंघात अनिल दादा जगताप यांची ताकद दुपटीने वाढली आहे. मराठा सेवक व सकल समाजबांधवांनी घेतला निर्णय ऍड मंगेश पोकळे, भानुदास जाधव,किशोर पिंगळे,गंगाधर काळकुटे, बळीआप्पा गवते,स्वप्नील भैय्या गलधर,डॉ.गणेश ढवळे,डॉ.बाळासाहेब पिंगळे,हनुमान मुळीक,जयदत्त थोटे, गोरख शिंदे,संजय गोडसे,लक्ष्मण नरनाळे,ऍड बापूराव जाधव,युवराज मस्के, अशोक सुरवसे,तुळशीदास महाराज शिंदे,समाधान कागदी,शेळके पाटील आदीजण याप्रसंगी उपस्थित होते.

# धनंजय मुंडेंची आज सायंकाळी ५ वाजता घाटनांदूरला प्रचार सभा

## धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांची सिरसाळ्यात सायंकाळी ७ वा संयुक्त प्रचारसभा

**परळी वै.। प्रतिनिधी**

धनंजय मुंडे यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली असून उद्या शुक्रवार (दि. १५) रोजी धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ परळी मतदारसंघात दोन प्रचार सभांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिली सभा ही सायंकाळी ५ वाजता धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथे बाजार चौकात आयोजित करण्यात




आली आहे. या सभेस धनंजय मुंडे यांच्यासह महायुतीतील स्थानिक मान्यवर नेते व पदाधिकारी आदी उपस्थित राहतील. दुसऱ्या सभेस धनंजय मुंडे यांच्यासह आ.पंकजाताई मुंडे या देखील उपस्थित राहणार असून, ही संयुक्त प्रचार सभा सिरसाळ्यातील जायकवाडी वसाहत मैदानात आयोजित करण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांच्या प्रचारात आ.पंकजाताई, माजी खा.डॉ.प्रीतमताई, माजी आ.आर टी जिजा देशमुख, माजी आ.संजय भाऊ दौंड, यांच्यासह महायुतीतील अनेक मान्यवर नेते सहभागी झाल्याने मुंडेंचे पारडे जाड झाल्याचे मानले जात आहे.

# राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य भक्तीस्थळाचा आशीर्वाद धनंजय मुंडे यांच्या पाठीशी

**परळी वै । प्रतिनिधी**

**लिंगायत समाजाची पंढरी समजल्या जणाऱ्या राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज संजीवन समाधी भक्तीस्थळ अहमदपूर येथील आशीर्वाद धनंजय मुंडे यांच्या पाठीशी असून, जनसामान्यांची सेवा करणाऱ्या धनंजय यांच्या पाठीशी आपले आशीर्वाद कायम असल्याचे भक्तीस्थळाचे आशीर्वाद धनंजय यांच्या पाठीशी असल्याचे भक्तीस्थळाचे पालक आचार्य गुरुराज महाराज अहमदपूरकर यांनी धनंजय मुंडे यांच्या भेटीत सांगितले आहे.**



धनंजय मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत आचार्य गुरुराज महाराज यांची धर्मापुरी येथे भेट घेऊन त्यांचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. परळी शहरातील विद्यानगर भागात धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून महात्मा बसवेश्वर यांचा अर्धाकृती पुतळा बसवण्यात आला असून तिथे उभारण्यात आलेल्या उद्यानासही महात्मा बसवेश्वर यांचे नाव देण्यात आलेले आहे. बीड जिल्ह्यातील शक्तीस्थळ श्री क्षेत्र कपिलधार येथील मंदिर व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी देखील धनंजय मुंडे यांनी पालकमंत्री म्हणून पुढाकार घेत १०० कोटी रुपयांच्या आराखड्यास पर्यटन विभागाकडून प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. परळीतील लिंगायत समाजातील बांधवांच्या प्रत्येक सुख-दुःखात देखील धनंजय मुंडे सहभागी असतात. इतकेच नव्हे तर लिंगायत समाजातील अनेक सहकाऱ्यांना धनंजय मुंडे यांनी विविध स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनेक मानाची पदे दिलेली आहेत. त्यामुळेच जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला नेता अशी ओळख धनंजय मुंडे यांनी तयार केलेली आहे. दरम्यान आचार्य गुरुराज महाराज अहमदपूरकर यांनी भक्तीस्थळाचे आशीर्वाद धनंजय मुंडे यांच्या पाठीशी आहेत असे म्हणत विजयी आशीर्वाद दिले आहेत. यावेळी ऍड.गोविंदराव फड, प्रा.चेतन सौंदळे यांसह आदी उपस्थित होते.

## पान १ वरून...

### सत्ता द्या, ३ लाख रुपयांपर्यंतची

देण्यासह इतर शेतकरी योजना द्याव्यात, असे म्हटले. तसेच राहुल गांधी यांनी राज्यातील सोयाबिन लागवडीसाठी ४ हजार रुपये प्रतिक्विंटल खर्च येतो. पण त्याला केवळ ३ हजार रुपयांचा दर मिळतो. याचा अर्थ क्विंटलमागे १ हजार रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान होते. शेतकऱ्यांना दुप्पट उत्पन्न सोडाच भाजपने शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने शेतमाल दराने विक्री करण्यास मजबूर केल्याची टीका राहुल गांधी यांनी केली आहे.

----------

### मुंदडांना ओबीसी द्वेष

केल्याचे बोलले जात असून गावागावांमध्ये ओबीसी समाजातील अनेक व कार्यकर्ते नाराज असल्याचे म्हटले जात आहे. मुंदडा यांनी अजूनही अशा नाराज कार्यकर्त्यांची नाराजी दूर न केल्यामुळे त्याचा थेट फायदा आता महायुगासा आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना होणार असल्याचे म्हटले जात आहे. ओबीसी मधील अनेक नाराज नेते पृथ्वीराज साठे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा असून त्याचा थेट फटका नमिता मुंदडा यांना बसणार आहे. तर दुसरीकडे केज मतदार संघातील वंजारी समाज सुद्धा नमिता मुंदडा यांची साथ सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये आमदार म्हणून नमिता मुंदडा यांनी ज्या पद्धतीने काम करणे गरजेचे होते त्या पद्धतीने त्यांनी केले नाही, त्यामुळे गावागावात नाराजी असल्याची जोरदार चर्चा आहे. नंदकिशोर मुंदडा आणि अक्षय मुंदडा यांनी गेल्या पाच वर्षांमध्ये केज मतदारसंघात सुडाचे राजकारण केले असल्याचा आरोप सुद्धा अनेक वेळा झालेला आहे. निधी वाटपात मोठ्या प्रमाणामध्ये गावागावात दुजाभाव करण्यात आला असल्याचे सुद्धा म्हटले जात आहे. मुंदडा यांचे हेच राजकारण आता नमिता मुंदडा यांच्यासाठी अडचणीचे ठरत असून ओबीसी समाजातील गावांमध्ये तीव्र नाराजी असल्याची चर्चा आहे. प्रत्येक गावामध्ये एका ओबीसी नेत्याला जवळ करून दुसऱ्यावर सुड उगवण्याच काम गेल्या पाच वर्षात केलं गेलं असल्याची चर्चा असून नमिता मुंदडा यांना या निवडणुकीत फटका बसणार असल्याचे बोलले जात आहे. ज्या वंजारी समाजाच्या जीवावर नमिता मुंदडा आमदार झाल्या, त्याच वंजारी समाजातील अनेक कार्यकर्त्यांना अजूनही मुंदडा यांनी न्याय दिलेला नाही. तसेच वंजारी समाजाची अनेक गावे अजूनही विकासापासून दूर आहेत. त्यामुळे या निवडणुकीत नमिता मुंदडा यांची साथ सोडायची असा निर्धार आता अनेक वंजारी समाजातील गावांनी केला असल्याचे म्हटले जात आहे. तर ओबीसी मधील अनेक नेते पृथ्वीराज साठे यांच्या संपर्कात असल्याचे सांगितले जात असून येणाऱ्या काळात साठे यांना हे सर्व नाराज असलेले कार्यकर्ते मदत करणार असल्याचे सुद्धा बोलले जात आहे.

-------------

### स्व.मुंडे साहेबांपासून प्रत्येक

आमचा सहभाग असावा, हा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. या भागाच्या सर्वांगीण विकासाचा मी शब्द देतो, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. जुना रेनापुर मतदार संघ असल्यापासून स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांनी त्यानंतर पुढे मी व धनु भाऊंनी तसेच प्रीतम ताई यांनी या भागाच्या विकासासाठी प्रयत्न केले. महामार्गांचे जाळे पसरले त्याचबरोबर सूक्ष्म सिंचनाच्या सोयी केल्या. या पट्ट्याने आमच्यावर खूप प्रेम केले व आम्हाला खूप आशीर्वाद दिले. आज तेच प्रेम व आशीर्वाद मी माझ्या भावासाठी मागायला आले आहे, असे आमदार पंकजाताई म्हणाल्या. दरम्यान मी माझ्या भावाला एक मोठे गिफ्ट देत असून गुरुवारी वैद्यनाथ कारखान्याचे रोलर पूजन करत आहे. कारखाना सुरू झाल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न मिटणार आहे, अशी घोषणा पंकजाताई मुंडे यांनी केली आहे. वैद्यनाथ कारखाना सुरू होण्याची आनंदवार्ता समजल्याने आता उसावरून राजकारण करणाऱ्यांची बोलती बंद होणार आहे. दरम्यान इथल्या लोकांची इच्छा होती की सभेला धनुभाऊ व पंकजाताई यांनी एकत्र हेलिकॉप्टर मध्ये यावे, यावर बोलताना आम्ही धनुभाऊंची विजयी सभा घेऊन गुलाल उधळायला उजनी पाटीला हेलिकॉप्टरने येऊ, असेही पंकजाताई पुढे बोलताना म्हणाल्या. यावेळी महायुतीतील पदाधिकारी, मान्यवर नेते तसेच पट्टीवडगाव जिल्हा परिषद गटासह पंचक्रोशीतील नागरिक प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------

### निवडणुकीमुळे राज्यातील शाळांना

मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. तसेच अनेक मतदान केंद्रेही शाळांमध्ये असतात. मतदानासाठीची तयारी करण्यासाठी निवडणूक प्रशासन शाळा ताब्यात घेते. या पार्श्वभूमीवर १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शाळांना सुटी देण्याचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तालयाने शिक्षण विभागाला सादर केला होता. या अनुषंगाने शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी परिपत्रकाद्वारे शिक्षण आयुक्तांना निर्देश दिले आहेत.

------------

### मुंडे बहिण-भावाच्या पाठबळाने डॉ.योगेश

आ.पंकजाताई मुंडे, माजी खा.प्रीतमताई मुंडे, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी देखील सभा घेऊन विजयी करण्याचा निश्चय केला. तसेच, काल खुद्द अजित पवार, धनंजय मुंडे यांनी देखील सभा घेतली. डॉ.योगेश क्षीरसागर यांना मतदारसंघातून जनसामान्य नागरिकांच्या सभा, कॉर्नर बैठका, रॅलीमधून मोठा प्रतिसाद मिळत आहे. यामुळे विरोधकांमध्ये धाकधूक वाढली आहे. डॉ.योगेश क्षीरसागर आणि डॉ.सारिका क्षीरसागर यांनी मागील एक ते दीड वर्षात बीड मतदारसंघ पिंजून काढला. नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. यामुळेच त्यांना लोकांचा पाठिंबा मिळत आहे. डॉ.योगेश क्षीरसागर हे उच्चशिक्षित, सुसंस्कृत, शांत, संयमी, युवा नेतृत्व असल्याने त्यांना नागरिकांच्या समस्यांची जाण आहे. त्यामुळे त्यांना निवडून विधानसभेत पाठवण्याची तयारी बीड मतदारसंघातील मतदारांनी केली असल्याचे चित्र आहे. बीडमध्ये सभेत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी योगेश क्षीरसागरांच्या पाठिशी मोठी ताकद उभी केली. सभेपूर्वी धनंजय मुंडे यांनी बीडमध्ये एका ठिकाणी बैठक घेतली. त्या बैठकीत सर्व नाराज व्यक्तींची मते जाणून घेतली. या बैठकीला डॉ.योगेश क्षीरसागर हे देखील उपस्थित होते. बैठकीनंतर अजित पवार यांचे आगमन होताच व्यासपीठावर माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, माजी गटनेते फारुक पटेल, ज्येष्ठ नेते मोईन मास्टर, बबनराव गवते, महादेवराव उबाळे, बाळासाहेब गुजर, बरकत पठाण, अलीम पटेल, जीवन घोलप, रामदास सरवदे, संतोष क्षीरसागर, संभाजी काळे, नंदू गवळी, बाळासाहेब धोत्रे, गौरव जावळे, शकीलखान, आक्रम बागवान असे अनेकजण पोहोचले. या सर्वांनी आता योगेश क्षीरसागरांचे काम जोमाने करण्याचा निर्णय अजितदादांच्या उपस्थितीत घेतला. त्यामुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत कलह सध्यातरी मिटल्याचे चित्र आहे.

-------------

### आष्टी मतदार संघात गावागावात

आवाहन केले जात आहे. दहाडने वाला एक वो टायगर; खेल पलटने वाला है,अब ना रूकेगा सुरेश आण्णा धस जनता का रखवाला है , क्योकी माहोल बदलने वाला है,परिवर्तन होने वाला है!हा एकच नारा घुमत आहे. पाटोदा तालुक्यात गुरुवार १४ नोव्हेंबर रोजी अनेक गावांना सुरेश धस यांचा गणगेवाडी, कणसेवाडी (गुंडेवाडी), बीडसांगवी, चिखलीनाथ, अंतापुर, निवडुंगा, वहाली, सावरगाव, लांबरवाडी, सुप्पा, बेदरवाडी, गवळवाडी, नागेशवाडी, कुटेवाडी, शिखरवाडी, पारनेर,येवलेवाडी, सौताडा, भुरेवाडी, मुगगाव (जोगदंडवाडी) या गावांना भेटी देत संपन्न झाला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष भागवत येवले, जि.प.सदस्य माऊली जरांगे,भाऊसाहेब भवर,मधुकर गर्जे,संतोष राख,संजय नवले,महेंद्र गर्जे,सुखदेव सानप,गोवर्धन सानप,किरण शिंदे,सिद्धेश्वर ढोले,अभय पवार,देविदास खोटे,संतराम माने,दगडू गोळवे,माजी सरपंच हनुमंत दौलतराव सोडगे, नाना गोळवे, माणिकराव सोंडगे,महेश सोंडगे,फुलाजी सोंडगे,शिवनाथ सोंडगे, अंबादास गवळी,राजाभाऊ सोंडगे,पंढरीनाथ सोंडगे,अजिनाथ सोंडगे,सुशांत सोंडगे,शाहूराव गवळी, देविदास गोळवे,प्रल्हाद गळवी, रोहिदास गळवी,लक्ष्मण दहिवले,सरपंच शुभम नवले,संतोष औटे,अशोक दहिवले,अभिजित नवले,आलीम शेख, भाऊसाहेब भोपाळे, मोहन भोपाळे, श्रीहरी सगळे,सतीश अंधुरे,हभप हनुमंत महाराज येवले,संजय नवले,महेंद्र गर्जे,पत्रकार दिनेश लिंबेकर,गोरख येवले,सरपंच परशराम टेकाळे, अशोक शेठ येवले,कैलास टेकाळे,सद्गुरु नेमाने,अंगद येवले,ईश्वर येवले, विष्णू येवले,सयाजी येवले,नारायण टेकाळे, मल्हारी नेमाने,दादा कोल्हे आदींसह महिला भगिनी, ग्रामस्थ व मतदार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

### धोंडे साहेब बोलतच नाहीत

निवडणुकीमध्ये मुंडे कुटुंबाच्या विचाराला मतदान करणारा हा मतदारसंघ आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये पंकजा मुंडे यांना या मतदारसंघाने ओबीसी मराठा असा संघर्ष होऊन सुद्धा चांगले मताधिक्य दिले होते. पंकजा मुंडे यांच्या पराभवानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये आष्टी -पाटोदा-शिरूर मतदार संघामध्ये ओबीसीचाच आमदार करायचा असा निर्धार ओबीसी समाज बांधवांनी केला होता. त्यानुसार माजी आमदार भीमराव धोंडे यांच्याकडे ओबीसी समाज मोठ्या आशेने पाहत होता. त्यातच धोंडे यांनी अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेत उमेदवारी दाखल केली. सध्या ते जोरदार प्रचार करत आहेत मात्र त्यांच्या जुन्या ओळखीचे लोक सोडली तर नवीन मतदार किंवा कार्यकर्ता त्यांना भेटायला आल्यावर.. धोंडे साहेब बोलतच नाहीत, त्यांना आम्ही मतदान करावं कसं? असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. त्यामुळे ओबीसी ट्रॅक्टरच्या प्रभावात दारात चालून आलेली आमदारकी जाते की काय? अशी चर्चा आता आष्टी मतदार संघामध्ये होताना दिसत आहे.

-------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. १५ नोव्हेंबर २०२४



## हनुमान देवळा मंदिर येथे फक्त महिलांसाठी कार्तिकस्वामी दर्शन योग



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर व १६ या दोन दिवसात फक्त महिलांसाठी कार्तिकस्वामी दर्शन योग असून या दोन दिवसीय कालावधीत फक्त महिलांसाठी दर्शन खुले राहिल. तर पुरूषांना दि.१६ नोव्हेंबर रोजी पहाटे ३ ते रात्री ९ पर्यंत दर्शन घेता येईल.

श्री देवळा हनुमान मंदिर मंगळवार पेठ, अंबाजोगाई या ठिकाणी कार्तिकस्वामी दर्शन योग सोहळा आयोजित केला असून हे मंदिर मराठवाड्यात एकमेव मंदिर आहे. हा दर्शन योग सोहळा फक्त महिलांसाठी आहे. दि.१५ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी रात्री ९.५५ पासून दि.१६ नोव्हेंबर शनिवार पहाटे २.५८ वाजेपर्यंत हा दर्शन योग सोहळा राहिल. दि.१५ नोव्हेंबर व १६ नोव्हेंबर या कालावधीत फक्त महिलांसाठी कार्तिकस्वामी दर्शन योग सोहळा असल्याने व महिलांसाठी दर्शन खुले असल्याने या कालवधीत पुरूषांनी दर्शनासाठी गर्दी करू नये. पुरूषांना दि. १६ नोव्हेंबर शनिवार पहाटे ३ ते रात्री ९ पर्यंत दर्शन घेता येईल. अशी माहिती संयोजकांनी दिली आहे.

# शहरातील कचरा बिंदुसरा नदीपात्रात ; बीडकरांचे आरोग्य धोक्यात

## घनकचरा व्यवस्थापनाचे महिन्याला २७ लाख आणि वर्षाकाठी साडे ३ कोटी कोणाच्या घशात? -डॉ.गणेश ढवळे

**बीड | प्रतिनिधी**

बीड शहरातून गोळा करण्यात येणारा घनकचरा नियोजित नाळवंडी रोडवरील भाड्याने घेतलेल्या खदानीत न टाकता बिंदुसरा नदीपात्रात नगरपरिषद मार्फत टाकण्यात येत असुन यामुळे बिंदुसरा नदीचे पात्र अरूंद करून त्यावर भुमाफियांच्य संगनमताने अतिक्रमण करण्याचा कुटील डाव असुन बिंदुसरा नदीपात्रात कचरा टाकल्याने होणा-या प्रदुषणामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात असुन संबंधित प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड,शेख,युनुस, अशोक येडे यांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री, आरोग्य मंत्री सचिव नगरविकास मंत्रालय यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.





बीड शहरात दररोज अंदाजे ७२ टन कचरा निघतो यातील काही कचरा नगरपरिषद मार्फत उचलण्यात येतो तर ज्या ठिकाणी कचराकुंडी नाही अथवा घंटागाडी येत नाही त्याठिकाणचे नागरीक मोकळ्या मैदानात, रस्त्यावर टाकतात. नगरपरिषद मार्फत उचलण्यात आलेला कचरा नाळवंडी नाका रोडवरील भाड्याने घेतलेल्या खदानीत घनकचरा व्यवस्थापन करून टाकणे बंधनकारक असताना ठेकेदार आणि वाहन चालकांनी डिझेल वाचवण्यासाठी बिंदुसरा नदीपात्रातील सिमेंट रस्त्यावरून नदीपात्रात फेकण्यात येतो.नगरपरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निता अंधारे यांना वारंवार लेखी तक्रारी आणि आंदोलने करून सुद्धा त्यांच्या कडुन दुर्लक्ष करण्यात येत आहे. बीड पालिकेने १० वर्षांपूर्वी बिंदुसरा नदी पात्राच्या बाजुची मोठमोठी झाडे तोडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते मोंढा असा १० फुटांचा रस्ता नागरीकांची मागणी नसतानाही भुमाफियांना नदीपात्रात अतिक्रमण करण्यासाठी बनवलेला आहे. तो आता ३० फुटाचा झाला असुन भविष्यात पुन्हा यावर अतिक्रमण करून नदीपात्रात अरूंद करण्यात येणार असल्याने भविष्यात पुर आला तर बीडकरांना जिवित व वित्तहानीचा धोका आहे. तसेच नदीपात्रातील प्रदुषणामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

बीड नगरपालिके मार्फत शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी कंत्राटदाराला महिन्याकाठी २७ लाख व वर्षाकाठी साडे ३ कोटी रुपये देण्यात येतात.मात्र नियमित घंटागाडी पाठवणे, कचरा उचलणे, गल्लोगल्ली कचरा संकलन करणे आदी कामे कागदोपत्रीच होत असुन नगरपरिषद अधिकारी, पदाधिकारी लाभार्थी असल्याने मुग गिळून गप्पच असतात.बिंदुसरा नदीपात्रात कचरा टाकल्याने पात्र प्रदुषित होऊन दुषित पाण्याचा पुरवठा झाल्याने रोगराई पसरून नागरीकांचे आरोग्य धोक्यात असुन याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे त्यामुळे कोट्यवधींचा खर्च नेमका कोणाचा घशात जातो असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

**प्रशासनाच्या आशिर्वादाने भुमाफिया सक्रिय :- रामनाथ खोड**

नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासनाच्या आशिर्वादाने भुमाफियांनी पुररेषा ओलांडून बिंदुसरा नदी पात्रात अतिक्रमण केले आहे.सामान्य नागरीकांना एका कागदासाठी १०० चकरा माराव्या लागतात मात्र नगर रचना विभागातुन भुमाफियांना त्यांच्या घरी जाऊन परवानगी दिली जाते. नदीपात्रातील अतिक्रमणामुळे भविष्यात पुराचा धोका उद्भवून जिवितहानी व वित्तहानी होऊ शकते त्यामुळे संबंधित प्रकरणात जबाबदार अधिकारी आणि भुमाफियांवर कठोर कारवाई करण्याची गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी सांगितले.

## शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी धनंजय सोळंके यांची नियुक्ती करा, कार्यकर्त्यांची खा.श्रीकांत शिंदे यांच्याकडे मागणी

**माजलगाव | प्रतिनिधी**

शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हाप्रमुख पदावरून अनिल जगताप यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर माजलगाव येथील निष्ठावंत शिवसैनिक व शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांना जिल्हाप्रमुख म्हजून नियुक्त करावे अशी मागणी धारूर वडवणी माजलगाव येथील प्रमुख शिवसैनिकांच्या झालेल्या बैठकीत खा डॉ श्रीकांत शिंदे यांच्याकडे करण्यात आली.



मागील २० वर्षांपासून पापा सोळंके हे शिवसेनेत कार्यरत आहेत.माजलगाव मतदार संघात मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५२६ कुटुंबांना ३ कोटी च्या वर सहाय्य करणारे एकमेव शहरप्रमुख म्हणून धनंजय पापा सोळंके यांची ओळख आहे.खासदार श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त म्ब्युलन्स देणारे पापा सोळंके हे एकमेव शहर प्रमुख आहेत.

खासदार श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण लोकसभा निवडणुकीत दहा दिवस तळ ठोकून प्रचार केलेल्या कामाची पावती पापा सोळंकेना मिळणार असल्याचे कार्यकर्त्यातून बोलले जात आहे.सध्या माजलगाव मतदार संघात जिल्हाप्रमुख नसताना मतदार संघातील सर्व शिवसैनिकांची मोट बांधण्याचे काम धनंजय पापा सोळंके यांनी केले आहे.या सगळ्या कामाची पावती पापा सोळंके यांना द्यावी अशी मागणी माजलगाव धारूर वडवणी येथील कार्यकर्त्यातून जोर धरू लागली आहे.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा गोरंट्याल यांना पाठिंबा

**जालना | प्रतिनीधी**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष,सिटू आणि शेतमजूर युनियनने जालना विधानसभा मतदारसंघात इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांना पाठिंबा देत त्यांना मोठया मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, २०१४ पासून केंद्रात भाजप प्रणित आणि महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आल्यापासून शेतकऱ्याची थट्टा केली जात आहे. २०१३ मध्ये सोयाबीनला प्रति क्रिटल ७ हजार रुपये, तुरीला १२ हजार रुपये आणि कापसाला १० हजार रुपये भाव होते. हे भाव मागील दहा वर्षात निम्म्यावर आले असून या उलट शेतकऱ्यांना लागणाऱ्या शेती उपयोगी वस्तूंचे भाव वाढले आहे.शेतीमालाला भाव नाही, शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही आणि मोदी सरकारने भांडवलदारांना २० लाख कोटीची करमाफी दिली आहे.

महाराष्ट्रात महायुती सरकारने मुंबई विमानतळ, बंदरे, धारावी प्रकल्प,सिमेंट हायये, शेती व प्रीपेड करार अदानीच्या खिशात घालून त्याला मालामाल केले असल्याचा आरोप या पत्रकात करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पाठवून राज्यातील तरुणांना बेरोजगार केले जात आहे: यामुळे महायुती सरकारला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही.

महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यात जनतेचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव, कामगार कायद्यातील कामगार विरोधी तरतुदी रद्द करणे, महिलांना दरमहा तीन हजार रुपये आर्थिक मदत, अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर आणि शालेय पोषण आहार कामगार या योजना कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करणे, मुला-मुलींना मोफत शिक्षण, जातनिहाय जनगणना, ५०% आरक्षणाची मर्यादा समाप्त करून सर्व मागास घटकांना आरक्षण देणे. इ. जनतेच्या बाजूचा जाहीरनामा जाहीर केला आहे. तसेच भारतीय संविधान बदलण्याचे भाजपचे कटकारस्थान हाणून पाडायचे वचन महाविकास आघाडी जनतेला देत आहे. म्हणून शिंदे सरकारचा पराभव करून महाविकास आघाडीलाच प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन अण्णा सावंत,मधुकर मोकळे, प्रभाकर कुलकर्णी, बाबासाहेब पाटोळे,मारुती खंदारे

मधुकर एखंडे,सरिता शर्मा,गौरव चव्हाण,अॅड. अनिल मिसाळ,राहुल हनवते आदींनी केले आहे.

पान ६ वरून...

### आष्टी मतदारसंघात सुरेश

न्याय देण्याचे काम केले. आणि आता चौथ्यांदा ते आमदरकीच्या रिंगणात उतरले असून मोठ्या प्रमाणात गोरगरीब, वंचित, शेतकरी,दीन दुबळ्या,भटक्या समाजातील लोकांच्या आशिर्वादाने ते निवडणूक लढवत आहेत.मतदारसंघात त्याना वाढता पाठिंबा मिळत असून शहर, गाव,वस्ती,वाडी,यासह ठिकठिकाणी त्याचा बोलबाला आहे.सर्व सामान्य मतदारांनी त्याचा विजयाचा विडा उचलला असून उद्या लोकप्रतिनिधीं म्हणून मोठ्या मताधिक्याने सुरेश धस याना विजयी करण्याचा संकल्प मतदारांनी केला आहे.

### शिवसेना उबाठा गटाच्या

राम मंजुळे, सिराज शेख, सोमनाथ धोत्रे, पिंटू कुऱ्हाडे, गोरख इटकर, अशोक पवार, धोंडीराम पवार जमान शेठ ,संदीप देवकर भारत विटकर, कोणदराबाई देवकर, नंदाबाई शिंदे, अनिता देवकर, संगीता देवकर, रूपाली पवार शशिकला मंजुळे संगीता, पवार, सुरेखा पवार, सरस्वती चव्हाण, सूरया शेख अप्सरा शेख, शबाना शेख, आलीम शेख, निकत शेख, नसीम शेख, अमित सय्यद, मेहरून सय्यद, मुन्ताफ सय्यद, फर्जना शेख, शमी शेख, साबेरा शेख, अफसरबिन शेख, मना शेख, मिनाज शेख, समदानी, सखाबाई माणिक, सुंदराबाई चव्हाण, मंजुरा शेख, निर्मला कुऱ्हाडे, नलिनी कुराडे, निलाबाई धोत्रे, गंगुबाई धोत्रे, कमल पवार, तारामती जाधव, विवेक हुलगुंडे ,अशा धोत्रे वैजंता पवार, समिंदर पवार, अप्सराबाई पवार, सरूबाई धनवडे, चंद्रकला धोत्रे, शकुंतला पवार, पूजा जाधव, सरस्वती चव्हाण, संगीता पवार, शकुंतला जाधव, सूर्यमाला साळुंखे, विठाबाई देवकर, गजाबाई पवार, महानंदा चव्हाण, सुमनबाई देवकर ,सीनाबाई ईटकर आदींनी प्रवेश केला.

### डॉ.योगेश क्षीरसागरांना

घडामोडींवरून डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पारडे जड झाल्याचे दिसत आहे. मुस्लिम समाजाची सुशिक्षित, निर्व्यसनी उमेदवाराला साथ!

बीडमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष कार्यालयात अल्पसंख्याक समाजातील प्रतिष्ठित नागरिकांसोबत अल्पसंख्याक सेलची बैठक पार पडली. या बैठकीत अनेकांनी विचार मांडले. मुस्लिम समाजाला कुणीही गृहित धरण्याची चूक करू नये, अनेकांनी ठणकावले. मुस्लिम भागात आणखी जागरूकता निर्माण करू, विकासाच्या मुद्द्यावर मतदान मिळविण्यासाइी आपण सोबत आहोत. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासारख्या सुशिक्षित, निर्व्यसनी उमेदवाराला साथ देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यावेळी उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी, माजी नगरसवेक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आ.कैलास गोरंटयाल यांची

असून प्रत्येक गावात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. ठिक ठिकाणी ढोलताशा, फटाक्यांची आतषबाजी करत जंगी स्वागत करून आ.कैलास गोरंटयाल यांना विजयी करण्याचा ठाम निर्धार मतदारांनी केल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे.

### कितीही नेते एकत्र आले

कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. समाजकारण,राजकारणाचा उपयोग जनहिताच्या कामासाठी करावा लागतो.मागील पाच वर्षाच्या आमदारकीच्या काळात सातत्याने प्रलंबित विकास कामांचा आढावा घेत मतदारसंघात पंचायत समिती गणनिहाय विकासकामे पुर्ण करत जनतेला दिलेला शब्द पाळला,म्हणूनच जनता पुन्हा प्रचंड बहुमतांनी विजयी करणार आहे, त्यामुळे आपणही आपले एकही मतदान वाया न जावू न देता मतदारसंघाच्या विकासासाठी मला प्रचंड मतदान करुन विजयी करा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.पुढे बोलताना ते म्हणाले, मागील पाच वर्षात मतदार संघातील गावांच्या विकासासाठी योगदान दिले आहे. प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होत खर्या अर्थाने जनसेवेचे व्रत अंगिकारले. आपल्याकडे आलेला प्रत्येक माणूस कुठल्या ना कुठल्या तरी अडचणीत असतो हे जाणून त्याचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्परता ठेवली, आता याच कामाची पोचपावती म्हणून जनतेतून आपल्याला मतदानरुपी आशिर्वाद मिळणार आहेत.मात्र विरोधकांना आपली लोकप्रियता सलते आहे,त्यामुळे त्यांच्यावर आरोप करताना पातळी सोडली जात आहे;परंतु या अशा विषारी प्रचाराला मतदारासंघातील मतदार भूलणार नाही.आपल्या हक्काचा माणूस कोण याची जाण जनतेला आहे. आमदार म्हणून काम करताना बीड शहरासह मतदार संघासाठी कोट्यवधींचा निधी खेचून आणत विकास कामांचा आपला आलेख उंचावत ठेवला आहे. जनतेने दिलेल्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न मागील पाच वर्षात केला.त्यामुळे निवडणुकीत आपल्या विरोधकांनी कितीही राजकीय टिका केली तरी त्यांना प्रत्यारोप करुन उत्तर द्यायचे नाही तर, विकासकामातून दाखवून द्यायचे अशी आपली विचारधारा आहे. माझं तुम्हाला सांगणं आहे की, आमदारीचा उपयोग करुन विकासाच्या अनेक योजना बीड मतदारसंघात राबवल्या. विकासाची गुढी उभारण्याचे काम मी करत आहे. आता भविष्यात बीड विधानसभा क्षेत्राचा विकास करण्यासाठी तसेच तरुणांना रोजगार निर्मिती, महिलांचे सक्षमीकरण, शेतकर्यांचा विकासासाठी व सामाजिक न्यायासाठी या निवडणूकीत पुन्हा एकदा प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

------------

## मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो ; मतदानाचा टक्का वाढवा म्हणून रॅली काढून जनजागृती

### आष्टी शहरात मतदान जनजागृतीसाठी तहसिलदार, गटशिक्षणाधिकारी रस्त्यावर

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदार संघात जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी व मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार वैशाली पाटील व गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली यामध्ये आष्टी तालुक्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.




आष्टी पंचायत समिती कार्यालयापासून महारॅली चे आयोजन गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.१३ ऑक्टोंबर रोजी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी नवे वारे नवी दिशा -मतदान आहे उद्याची अशा, सोडा सारे काम धाम- मतदान करणे पहिले काम, मतदार राजा जागा हो- लोकशाहीचा धागा होअशा अनेक घोषणांनी तालुक्यात मतदार जनजागृती करण्यात आली.मतदानामध्ये मतांची टक्केवारी वाढवावी असे आवाहन गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांनी केले आहे.आष्टी तालुक्यातील शहरासोबतच ग्रामीण भागात सर्व अधिकारी व कर्मचारी रॅलीत सहभाग होऊन मतदानाचा टक्का वाढावा म्हणून प्रबोधन केले.मतदार राजा जागा हो लोकशाही चा धागा हो,अशा घोषणा देण्यात आल्या मतदान जनजागृती करत मतदानाचे महत्त्व लोकांना पटवून घोषणांनी व हातातील फलकाद्वारे देण्यात आले.

## हेमंत क्षीरसागरांकडून पत्रकार साळुंके यांच्या कुटुंबाचे सांत्वन

बीड | प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील रहिवाशी असलेले पत्रकार चंद्रकांत साळुंके यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या निवासस्थानी जाऊन युवा नेते हेमंत क्षीरसागर यांनी साळुंके कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी या कुटुंबांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

बीड तालुक्यातील नागापूर येथील पत्रकार चंद्रकांत साळुंके यांचे गेल्या तीन दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले. दुचाकीवरून गावाकडे जात असताना खंडेश्वरी परिसरामध्ये त्यांच्या दुचाकीला अपघात होऊन त्यांच्या डोक्याला मार लागून ते जखमी झाले होते. त्यांच्यावर संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचार चालू असताना त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावर मंगळवारी नागापुर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर गुरुवारी युवा नेते हेमंत क्षीरसागर यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी मुलीच्या उपचारासाठी आपण सर्वतोपरी मदत करू असे त्यांनी यावेळी आश्वासन दिले. याप्रसंगी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमेदवार पृथ्वीराज साठे यांना बाबुराव पोटभरे,कॉ.बब्रुवान पोटभरे,राजेश व्हावळे, फिरोज शेख यांचा जाहीर पाठिंबा

अंबाजोगाई | प्रतिनिधी

केज मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना गुरुवार दि १४ रोजी विविध पक्षांच्या वतीने पाठिंबा जाहीर करण्यात आला. त्यामध्ये बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ बब्रुवाहन पोटभरे, लोकजन शक्ती पार्टीचे राजेश व्हावळे त्याचबरोबर प्रहार संघटनेचे अशोक गंडले व फिरोज शेख यांचा समावेश आहे. आज अंबाजोगाई शहरामध्ये पत्रकार परिषदेच्या माध्यमातून या सर्व पार्टी व सामाजिक संघटनांनी आपला जाहीर पाठिंबा महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे याना जाहीर केला. यावेळी पत्रकार परिषदेत बाबुराव पोटभरे, बब्रुवान पोटभरे, हारून इनामदार, राजकिशोर मोदी, डॉ नरेंद्र काळे, बबन लोमटे, राजेश व्हावळे, फिरोज शेख, अशोक गंडले आणी विनोद शिंदे हे उपस्थित होते.

याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की लोकांच्या मनाचा व त्यांच्या भावनांचा विचार व आदर करून आपण महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना बिनशर्त असा जाहीर पाठिंबा देत आहोत. केज मतदार संघात तयार झालेली एकाच कुटुंबाची मक्तेदारी , दडपशाही व हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी आपण विविध संघटनाच्या माध्यमातून एक सर्वसामान्य उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या पाठीशी खंबीरपणे ताकत उभी करत असल्याचे देखील बाबुराव पोटभरे यांनी यावेळी नमूद केले. केज मतदारसंघात एक



आमदार आहेत की तीन असा प्रश्न देखील सामान्य माणसाला पडत आहे. मतदार संघातील अधिकारी , कर्मचारी हा आमदार महोदयांच्या नातेवाईकाच्या दहशतिखाली वावरताना आढळून येत असल्याची खंत व्यक्त केली .आजची निवडणूक ही कुण्या पुढाऱ्यांच्या हातात नसून ती निवडणूक जनतेने आपल्या हातात घेतली असल्याने लोकांच्या भावनांचा आदर करण्यासाठीच पृथ्वीराज साठे यांना बळ देणार असल्याचे जाहीर केले . संपूर्ण मतदार संघातील अनेक कामे ही ठराविक अशा एकाच गुतेदाराला देऊन मतदार संघाचा विकास केला नसून आपला स्वतः चा विकास साधला असल्याची खरमरीत टीका देखील बाबूराव पोटभरे यांनी यावेळी केली. मागील पाच वर्षात मतदार संघास बदनाम करण्याचे पाप विद्यमान आमदार व त्यांच्या नातेवाईक मंडळीच्या वतीने करण्यात आली असल्याचे देखील पोटभरे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सांगितले. त्यामुळे जनमानसाशी नाळ जोडल्या गेलेल्या उमेदवाराच्या पाठीशी ताकत उभी करणे हे आपले कर्तव्यच असल्याचे सांगत मतदारांनी देखील भरघोस मतांनी पृथ्वीराज साठे यांनी निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे असेही आवाहन बाबुराव पोटभरे यानी केले.मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ बब्रुवान पोटभरे यानी देखील साठे यांना जाहीर पाठींबा व्यक्त केला. जातीवादी शक्तीला हाणून पाडण्यासाठी त्याचबरोबर एकाधिकार शाहीचा नंगानाच थोपवण्यासाठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने आपण पाठिंबा देत असल्याचे कॉ बब्रुवान पोटभरे यांनी सांगितले. चळवळीतील संपूर्ण संघटना मिळून जनसामान्यांच्या उमेदवार पृथ्वीराज साठे यांनाच सहकार्य करणार असल्याचे हारूनभाई इनामदार यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. अंबाजोगाई तसेच केज शहरातील विविध प्रकारचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी साठे यांना तमाम अंबाजोगाई शहर वासीयांच्या मदतीने मताधिक्य मिळवून देणार असल्याचे राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने राजेश व्हावळे यांनी देखील आपला जाहीर असा पाठींबा दिला. तर प्रहार संघटनेचे अशोक गंडले व फिरोज शेख यांनी देखील आपण पृथ्वीराज साठेंच्या खांद्याला खांदा लावून काम करणार असल्याचे यावेळी जाहीर केले. केज मतदार संघाच्या विकासाच्या व विविध प्रश्नांची उकल असलेल्या जाहीरनाम्याचे वाचन डॉ नरेंद्र काळे यांनी पत्रकार परिषदेत केले. याप्रसंगी बहुजन विकास मोर्चा, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, लोकजनशक्ती पार्टी, तसेच प्रहार संघटनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४
४

# हमीभाव केंद्र सुरू न झाल्याने सोयाबीन उत्पादकांची अडचण



**पुणे । प्रतिनिधी**

**केंद्र शासनाच्या वतीने हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी घोषणा झाली मात्र, केंद्रे सुरू न झाल्याने शेतकऱ्यांची अडचण कायम आहे. यंदाच्या हंगामासाठी केंद्राने सोयाबीनला ४८९२ रुपये प्रतिक्विंटल दर जाहीर केला आहे. बाजारात यापेक्षा कमी दराने सोयाबीन विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आलेली आहे.**

शेतकऱ्यांना यंदा पावसाची अपेक्षित साथ मिळाली. त्यामुळे हे पीक चांगले येणार अशी शेतकऱ्यांना आशा होती. मात्र, परतीच्या व मॉन्सूनोत्तर पावसाने पिकाचे अतोनात नुकसान केले. सध्या शेतकऱ्यांना पैशांची अडचण भासत असल्याने बाजारपेठेत सोयाबीनची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

यंदा केंद्र सरकारने सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल निश्चित करून राज्यात ९० दिवसांसाठी हमीभाव केंद्रे सुरू करण्यास मान्यता दिली. मात्र अद्याप खरेदी केंद्रे सुरू झालेली नाहीत. दरम्यान, व्यापाऱ्यांकडून सोयाबीनची प्रत बघून ३ हजारांपासून ४ हजार २०० रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी होत आहे. शेतकऱ्यांना कात्रीत पकडून त्यांची आर्थिक लूट केली जात असल्याचे पाहवयास मिळते आहे.

केंद्र सरकारने या पिकाला किमान हमीभाव ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल जाहीर केला आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारने ९० दिवसांसाठी हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्यास मान्यता दिली. किमान हमीभावापेक्षा कोणीही कमी दराने सोयाबीन खरेदी करू नये, असा कायदा केला आहे. परंतु शेतकऱ्याने सोयाबीन काढून बाजारपेठेत विक्रीला आणले तर सरकारी हमीभाव केंद्रे सुरू नसल्याने शेतकऱ्यांना नाइलाजाने सोयाबीनची विक्री करण्याशिवाय पर्याय राहत नाही. आज बाजारपेठेत सोयाबीनला तीन हजारांपासून चार हजार दोनशे रुपये प्रतिक्विंटलचा भाव व्यापाऱ्यांकडून दिला जात असल्याने शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.

### वर्षनिहाय सोयाबीनचे हमीभाव

२०१७ - तीन हजार ५०, २०१८ - तीन हजार ३९९, २०१९ - तीन हजार ७१०, २०२० - तीन हजार ८८०, २०२१ - तीन हजार ९५०, २०२२ - चार हजार ३००, २०२३ - चार हजार ६००, २०२४ - चार हजार ८९२.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३० : आजच्याच दिवशी थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी इंग्लंड या देशाला प्रयाण केले होते.
१९४५: व्हेनेझुएलाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९४९ : महात्मा गांधींच्या हत्येसाठी नथुराम गोडसे व नारायण आपटे यांना फाशी.
१९६१ : संयुक्त राष्ट्र या आंतरराष्ट्रीय संघटनेने आजच्याच दिवशी परमाणु हत्यारावर बंदी आणली होती.
१९७१ : इंटेल कंपनी ने जगातील पहिले व्यावसायिक मायक्रोप्रोसेसर चीप ४००४ प्रकाशित केले.
१९८९ : सचिन तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे पदार्पण केले.
१९९६ : भारतीय शास्त्रज्ञ डॉ. त्रिलोकीनाथ खुशू यांना संयुक्त राष्ट्रांतर्फे दिला जाणारा 'सासाकावा पर्यावरण पुरस्कार' जाहीर. पर्यावरणाचे रक्षण आणि नियोजन या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली.
१९९९ : रेवदंडा येथील निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांना हजारो समर्थभक्तांच्या साक्षीने प्रा. शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते 'शिवसनर्थ पुरस्कार' प्रदान
२००० : देशाचे अठ्ठाविसावे राज्य म्हणून झारखंड हे राज्य अस्तित्त्वात आले. राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून भाजपचे बाबूलाल मरांडी यांनी शपथ घेतली.
२००० : फिजी या देशात अकाली शासन बदल करणे अवैध घोषित करण्यात आले.
२००४ : अमेरिकेचे पूर्व विदेश मंत्री कॉलीन पॉवेल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२००७ : चिली या देशात ७.७ इतक्या तीव्रतेचा भूकंप झाला.
२००८ : योगेंद्र मक़बाल यांनी राष्ट्रीय बहुजन काँग्रेस या पक्षाची स्थापना केली.
२०१२ : शी जिनपिंग आजच्याच दिवशी चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३८ : विल्यम हर्षेल - जर्मन/ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ व संगीतकार. १७३८ मधे त्याने युरेनस ग्रहाचा शोध लावला. (मृत्यू: २५ ऑगस्ट १८२२)
१८६६ : भारताची प्रथम महिला बैरिस्टर कार्नेलीया सोराबजी यांचा जन्म.
१८७५ : बिरसा मुंडा - झारखंडमधील आदिवासी स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: १९००)
१८८५ : गिजुभाई बधेका - आधुनिक बालशिक्षणाच्या क्षेत्रातील आद्य कार्यकर्ते (मृत्यू: २३ जून १९३९ भावनगर, गुजराथ)
१८९१ : एर्विन रोमेल - जर्मन सेनापती (मृत्यू: १४ आक्टोबर १९४४)
१९०८ : अबार्थ कंपनी चे संस्थापक कार्लो अबार्थ यांचा जन्म. (मृत्यू: १९७९)
१९१७ : दत्तात्रेय शंकर तथा दत्ता डावजेकर - संगीतकार (मृत्यू: २००७)
१९१४ : भारतीय वकील आणि न्यायाधीशव्ही. आर. कृष्णा अय्यर यांचा जन्म. (मृत्यू: ४ डिसेंबर २०१४)
१९२७ : उस्ताद युनुस हुसेन खाँ - आग्रा घराण्याच्या ११ व्या पिढीतील गायक (मृत्यू: २९ सप्टेंबर १९९१)
१९२९ : शिरीष पै - कवयित्री.
१९३६ : भारतीय-कॅनेडियन पत्रकार आणि प्रकाशक तारा सिंग हेर यांचा जन्म. (मृत्यू: १८ नोव्हेंबर १९९८)
१९४८ : सुहास शिरवळकर - कादंबरीकार आणि रहस्यकथालेखक (मृत्यू: ११ जुलै २००३)
१९८६ : अशोक चक्र सन्मानित भारतीय वायुसेनेतील शहीद गरुड कमांडो ज्योतीप्रकाश निराला यांचा जन्म.
१९८६ : सानिया मिर्झा - लॉन टेनिस खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६३० : योहान केपलर जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (जन्म: १५७१)
१९३७ : हिंदीचे प्रसिध्द साहित्यकार जयशंकर प्रसाद यांचे निधन.
१९३८ : पंजाब येथील प्रसिध्द आर्य समाजाचे नेता तसेच समाजसुधारक महात्मा हंसराज यांचे निधन.
१९४९ : नथुराम गोडसे - महात्मा गांधींच्या वधाच्या कटातील प्रमुख आरोपी (जन्म: १९ मे १९१०)
१९४९ : नारायण दत्तात्रय आपटे - महात्मा गांधींच्या वधाच्या कटातील एक आरोपी
१९६१ : कम्युनिस्ट नेते बंकिम मुखर्जी यांचे निधन झाले.
१९८२ : आचार्य विनोबा भावे - भूदान चळवळीचे प्रणेते, महात्मा गांधींचे पट्टशिष्य, भारतरत्न १९८३ मरणोत्तर, १९४० मध्ये महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाच्या केलेल्या आंदोलनात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली. भूदान यज्ञात विनोबांनी देशभर पदयात्रा केली. (जन्म: ११ सप्टेंबर १८९५)
१९९६ : डॉ. माधवराव सूर्याजी पवार - कृषीतज्ज्ञ, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू.
१९९६ : भारताचे प्रसिध्द कवी व कथाकार आर सी प्रसाद सिंह यांचे १९९६ साली निधन.
२०१२ : कृष्ण चंद्र पंत - केन्द्रीय मंत्री व नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष (जन्म: १९३१)
२०१३ : मथुरा येथील प्रसिध्द संत कृपालू जी महाराज अनंतात विलीन झाले.
२०१७ : हिंदी कवी कुवर नारायण यांचे निधन.



# तूर पिकावरील किडी आणि रोगांचे एकात्मिक नियंत्रण

सध्या तूर पिकात फुलोरा ते शेंगा भरण्याची अवस्था सुरु आहे. या काळात पिकावर वेगवेगळ्या किडीं आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडी आणि रोगांचे वेळीच नियंत्रण केले नाही तर पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. जाणून घेऊ एकात्मिक नियंत्रण उपाय.

**तूर पिकाचे कीड आणि रोग व्यवस्थापन :**

पीक फुलोऱ्यापासून ते शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत असताना तूर पिकाला आवश्यकतेनुसार आणि उपलब्धतेनुसार पाणी द्यावे. रसशोषक आणि इतर किडींचा अंदाज घेऊन प्रति हेक्टरी ५ याप्रमाणे कामगंध सापळे लावावेत. शेतात पक्षांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी टी आकाराचे पक्षी थांबे प्रति हेक्टरी ५० ते ६०. उभारावेत. तूर पिकामध्ये वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. तुरीत वांझ रोगाचा प्रसार कोळी किडीमार्फत होतो म्हणून त्याच्या नियंत्रणासाठी अॅझाडीरॅक्टिन (३०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर पाणी किंवा पाण्यात विरघळणारे गंधक (८० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत घाटेअळी/पसारी पतंग आणि फळमाशीच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा अॅझाडिरेक्टीन (३०० पीपीएम) ५० मिलि किंवा इमामेक्टीन बेन्झोएट (५ एसजी) ४.४ मिलि किंवा क्लोरअॅन्ट्रानिलीप्रोल (१८.५ टक्के एससी) २ ते ३ मिलि प्रति १० लिटर पाणी फवारणी करावी. तूर पिकात तृणधान्याचे आंतरपीक घेतल्यास किडींचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते. एचएनपीव्ही या जैविक कीडनाशकाचा वापर करावा.

# हिवाळ्यात जनावरांना चारा देण्याच्या पद्धती

**हिवाळयाच्या काळात दुभत्या जनावरांची काळजी घेण्याबाबत निष्काळजीपणा केल्यामुळे गाई, म्हशीसारखे प्राणी कमी दूध देऊ लागतात. हिवाळयाच्या चार महिन्यांत दुभत्या जनावरांच्या चारा व देखभाल व्यवस्थेकडे विशेष लक्ष द्यावे. पशुपालकांनी जनावरांच्या आहाराचे व देखभालीचे योग्य व्यवस्थापन केले तर त्यांची जनावरे अधिक दूध देतात. हिवाळयाच्या चार महिन्यांत दुभत्या जनावरांना योग्य चारा देण्याची गरज आहे.**



**हिवाळ्यात जनावरांना हा चारा खायला द्या :**

पशु तज्ज्ञांच्या मते दुधाळ जनावरांना नेहमी ऋतुमानानुसार चारा द्यावा. विशेषतः हिवाळ्यात, सामान्य दिवसांपेक्षा जास्त डोस द्यावा. भारतात नोव्हेंबरपासून थंडीचे दिवस सुरू होतात आणि फेब्रुवारीपर्यंत थंडी कायम राहते. या दिवसात ज्या जनावरांना असा चारा द्यावा ज्याची पचनक्षमता ६० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये दुभत्या जनावरांना ज्वारी, गवार, नेपियर, सुदान, भुसा हा चारा द्यावा. तर जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये बरसीम, ल्युसर्न, ओट मेथी, भुसा आणि सायलेज हा चारा देणे योग्य मानले जाते. याशिवाय इतर पौष्टिक घटकही द्यावेत.

**दुभत्या जनावरांना आहार देताना हे लक्षात ठेवा :**

जनावरांना दररोज ठराविक वेळी चारा द्यावा. दिवसातून दोनदा आहार द्यावा. जनावरांना फक्त ८ ते १० तासांच्या अंतराने चारा द्यावा. त्यामुळे त्यांची पचनक्रिया व्यवस्थित राहते. जनावरांना नेहमी चाऱ्यासोबत धान्य द्यावे. त्यामुळे दूध उत्पादनात घट होत नाही. दूध काढल्यानंतर जनावरांना हिरवा चारा व धान्य द्यावे. हे त्यांच्या आरोग्यासाठी चांगले राहील. दुभत्या जनावरांची पचनक्रिया नेहमी निरोगी राहावी यासाठी जनावरांना नेहमी पाण्यात भिजवलेला पेंढा खायला द्यावा. कोरडा व हिरवा चारा नेहमी कुट्टी तयार करून जनावरांना द्यावा. त्यामुळे चाऱ्याची नासाडी कमी होते. तसेच जनावरांना चारा खाण्यात फारसा त्रास होत नाही. दुधाळ जनावरांना फक्त हिरवा चारा देऊ नये. त्यापेक्षा गव्हाचा कोंडा किंवा पेंढा मिसळून द्या, कारण हिरव्या चाऱ्यात ९० टक्के पाणी असते. हिरवा चारा जास्त प्रमाणात दिल्यास जनावरांच्या शरीराचे तापमान कमी होते.

**पशुखाद्यात 'या' पौष्टिक घटकांचा समावेश करा :**

दुग्धजन्य प्राण्यांपासून अधिक दूध उत्पादन मिळविण्यासाठी त्यांना नेहमी पौष्टिक आहार दिला पाहिजे. जनावरांना चाऱ्याच्या व्यतिरिक्त पोषक तत्वे, खनिज मिश्रण आणि मीठ दररोज द्यावे. जनावरांना फक्त धान्य देणे टाळावे. त्यामुळे जनावरांच्या पचनशक्तीवर विपरीत परिणाम होऊन दूध उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. तसेच दूध काढल्यानंतर धान्य व चारा दोन्ही द्यावे.

**गोठ्याचे व्यवस्थापन अशाप्रकारे करा :**

हिवाळयाच्या काळात गोठ्यात किंवा गुरांच्या देखभालीची विशेष काळजी घ्यावी, कारण थोड्याशा निष्काळजीपणामुळे मोठे नुकसान होते. साधारणपणे हिवाळ्याच्या चार महिन्यांत थंड वाऱ्यांमुळे वातावरणात थंडी वाढते. गायींच्या तुलनेत म्हशींना थंडीच्या वातावरणात अधिक समस्यांना सामोरे जावे लागते. पारा घसरल्याने प्राण्यांना शरीराचे तापमान राखण्यासाठी भरपूर ऊर्जा खर्च करावी लागते. निष्काळजीपणामुळे जनावरांना सर्दी, खोकला, सर्दी, न्यूमोनिया आदी आजार होऊ शकतात. गाई-म्हशींना दिवसा उन्हात बांधावे. संध्याकाळ होताच थेट थंड अंगावर येणार नाही अशा ठिकाणी बांधावे. तसेच जनावरांच्या गोठ्यातील फरशी नेहमी कोरडी ठेवावी. जर फरशी ओली असेल तर शेण गोळा केल्यानंतर त्यात कोरडी राख टाकून मूत्र वाळवावे. जनावरांचे शेड पूर्णपणे बंद ठेवू नये. त्यामध्ये पुरेशा प्रकाशाची तरतूद असावी. जनावरांच्या आरामासाठी जनावरांच्या शेडमध्ये जाड पेंढा पसरावा. प्राण्याला आठवड्यातून एकदा तरी आंघोळ घालावी.

# मुळा लागवड पद्धत

**मूळवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये मुळा हेक्टरी एक महत्वाचे पीक आहे. मुळा हे थंड हवामानातील पीक असून त्याची लागवड प्रामुख्याने रब्बी हंगामात केली जाते. परंतु उष्ण हवामानात चांगल्या वाढू शकणाऱ्या मुळयांच्या जाती विकसित करण्यात आल्यामुळे मुळयाचे पीक जवळ जवळ वर्षभर घेता येते.**

**हवामान आणि जमीन :**

मुळा हेक्टरी प्रामुख्याने थंड हवामानातील पीक आहे. मुळ्याची वाढ २० ते २५ अंश सेल्सिअस तापमानाला झपाट्याने होते. परंतु चांगला स्वाद आणि कमी तिखटपणा येण्यासाठी मुळ्याच्या वाढीच्या काळात १५ ते ३० अंश से. तापमान असावे. मुळयाच्या वाढीच्या काळात तापमान जास्त झाल्यास मुळा लवकर जून होतो आणि त्याचा तिखटपणाही वाढतो. मुळ्याची जमिनीतील वाढ चांगली होण्यासाठी निवडलेली जमीन भुसभूशीत असावी. भारी जमीनीची चांगली मशागत करावी. अन्यथा मुळ्याचा आकार वेडावाकडा होतो आणि त्यावर असंख्य तंतूमूळे येतात. अशा मुळ्याला बाजारात मागणी नसते. मुळ्यांची लागवड अनेक प्रकारच्या जमिनीत करता येत असली तरी मध्यम ते खोल भूसभूशीत अथवा रेताड जमिनीत मुळा चांगला पोसतो. चोपण जमिनीत मुळयाची लागवड करू नये.

**सुधारीत जाती :**

पुसा हिमानी, पुसा देशी, पुसा चेतकी, पुसा रेशमी, जपानीज व्हाईट, गणेश सिंथेटीक या मुळाच्या आशियाई किंवा उष्ण समशितोष्ण हवामानात वाढणाऱ्या मुळ्च्या जाती आहेत.

**हंगाम आणि लागवडीचे अंतर :**

महाराष्ट्रात मुळ्यांची लागवड वर्षभर करता येते. परंतु व्यापारी लागवड प्रामुख्याने रब्बी हंगामात केली जाते. रब्बी हंगामासाठी सप्टेबर ते जानेवारी हया कालावधीत बियांची पेरणी करावी. उन्हाळी हंगामासाठी मार्च-एप्रिल महिन्यात तर खरीप हंगामासाठी जून ते ऑगस्ट महिन्यात बियांची पेरणी करावी. लागवड करतांना दोन ओळीतील अंतर ३० ते ४५ सेमी आणि २ रोपांमधील अंतर ८ ते १० सेमी ठेवावे.

**लागवड :**

लागवड सपाट वाफ्यात किंवा सरी वरंब्यावर केली जाते. दोन वरंब्यामधील अंतर मुळ्यांच्या जातीवर अवलंबून असते. युरोपीय जातीसाठी हेक्टरी अंतर ३० सेमी ठेवतात. तर आशियाई जातीकरिता ४५ सेमी इतर ठेवतात. वरंब्यावर ८ सेमी अंतरावर २-३ बिया टोकून पेरणी करतात. सपाट वाफयात १५ बाय १५ सेमी अंतरावर लागवड करतात. बियांची पेरणी २-३ सेमी खोलीवर करावी. पेरणी पूर्वी जमिनीत ओलावा असावा. मुळा लागवड अंतर हेक्टरी मुळयाची जात. त्याची वाढ आणि हंगामावर अवलंबून असते. तथापि कमी अंतरावर लागवड केल्यास मध्महिन्यातम आकाराचे मुळे मिळून उत्पादन जास्त मिळते. मुळ्याच्या एक हेक्टर लागवडीसाठी १० ते १२ किलो बियाणे लागते.

**खते आणि पाणी व्यवस्थापन :**

मुळ्याचे पिक कमी कालावधीत तयार होणारे असल्यामुळे जास्त उत्पादन मिळण्यासाठी या पिकाला खते वेळेवर द्यावीत. जमिनीची मशागत करतांना चांगले कुजलेले शेणखत २५ टन दर हेक्टरी जमिनीत मिसळून द्यावे. मुळ्याच्या पिकाला दर हेक्टरी ३० किलो नत्र २० किलो स्फूरद आणि ८० किलो पालाश द्यावे. स्फूरद आणि पालाश यांची पूर्ण मात्रा आणि नत्राची अर्धीमात्रा पेरणीपूर्वी द्यावी. नत्राची उरलेली अर्धीमात्रा ही बी उगवून आल्यावर म्हणजेच पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी द्यावी.

**किड, रोग आणि त्यांचे नियंत्रण :**

काळी अळी ( मस्टर्ड सॉ फलाय) - मुळ्यावरील ही एक प्रमुख कीड आहे. लागवड झाल्यावर आणि मुळयाची उगवण झाल्यावर सुरूवातीच्या काळात हया काळ्या अळीचा उपद्रव मोठया प्रमाणात होतो. हया अळ्या पाने खातात आणि त्यामुळे पानांवर छिद्रे दिसतात.

उपाय - हया अळीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात २० मिली लीटर एन्डोसल्फान मिसळून पिकावर फवारावे.



मावा - हया कीडीचा उपद्रव ढगाळ हवामानात जास्त प्रमाणात होतो. हया किडीची पिल्ले तसेच प्रौढ किडे पानांतील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने गुंडाळली जातात. रोप कमजोर होते. पिवळे पडून रोप मरते.

उपाय - हया किडीच्या निचंत्रणासाठी १० लिटर पाण्यात २० मिलीलीटर डायमिथेईट मिसळून पिकावर फवारावे.

करपा - मुळ्याच्या पिकावर करपा रोग मोठया प्रमाणावर आढळतो. हया बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावामुळे पानांवर पिवळे फूगीर डाग अथवा चटटे पडतात. नंतर खोडावर आणि शेंगावर पिवळे डाग पडतात. पावसाळी हंगामात रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होतो.

उपाय - हया रोगाच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात २५ ग्रॅम डायथेन एम ४५ हे बुरशीनाशक मिसळून फवारणी करावी.

**काढणी उत्पादन आणि विक्री :**

मुळ्याची लागवड केल्यानंतर जातीनुसार ४० ते ५५ दिवसांनी मुळे काढणीसाठी तयार होतात. मुळे नाजूक आणि कोवळे असतानाच मुळयांची काढणी करावी. मुळा जास्त दिवस जमिनीत राहिल्यास कडसर, तिखट आणि जरड होतो, मुळ्याला गाभा रवाळ होऊन भेगा पडतात. मुळे काढण्यापूर्वी शेतीला पाणी द्यावे आणि हाताने मुळे उपटून काढावेत. नंतर त्यावरील माती काढून मुळे पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावेत. किडलेले, रोगट मुळे वेगळे काढावेत. मुळे पाल्यासह काढून विक्रीसाठी पाठवितात. पाने आणि मुळे यांना इजा होवू नये म्हणून टोपलीत किंवा खोक्यात व्यवस्थित रचून विक्रीसाठी पाठवावीत मुळ्याचे उत्पादन हे त्याची जात आणि लागवडीचा हंगाम यांवर अवलंबून असते. साधारणपणे रब्बी हंगामात मुळ्याचे दर हेक्टरी १० ते २० टन उत्पादन मिळते.

# ऊसतोड कामगारांचा कर्नाटककडे मोर्चा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील साखर कारखाने एक ते दीड महिना उशिरा सुरू होणार आहेत. गळीत हंगाम दीड महिने उशिरा सुरू होणार असल्याने हंगामातील लाखो रुपयांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात ऊस तोडणीसाठी मराठवाडा, विदर्भातून जाणाऱ्या मुकादम, ऊस तोड कामगारांनी आपले नुकसान टाळण्यासाठी उसतोडीकरिता कर्नाटक राज्याकडे मोर्चा वळवला आहे. यंदा दरवर्षीच्या तुलनेत साखर कारखान्यांचा गळीत हंगाम २० नोव्हेंबरला होणार आहे. एक ते दीड महिना ऊस तोड कामगारांनी घरी बसून करायचे काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आर्थिक अडचणींमुळे मुकादमाकडून उचल घेतली; मात्र कारखाने उशिरा सुरू झाले तर या ऊस तोड हंगामात एक-दीड लाखाचे नुकसान होईल.

# जयभवानीच्या गळीत हंगामाचा भव्य शुभारंभ

## ह.भ.प. महंत शिवाजी महाराज,माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांची प्रमुख उपस्थिती

**गेवराई । प्रतिनिधी**

शिवाजीनगर गढी येथील जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती ह. भ. प. महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, माजी चेअरमन जयसिंग पंडित, व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर यांच्यासह कारखान्याचे संचालक, सभासद, विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी ह.भ.प. शिवाजी महाराज आणि कारखान्याचे कर्मचारी राजेंद्र नवले व शंकर ढाकणे यांच्या शुभहस्ते विधीवत पूजा करुन गव्हाणीत मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बोलताना कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, म्हणाले की, साखरे बरोबरच उपपदार्थांचे उत्पादन होणार असल्यामुळे जयभवानी ऊसाला चांगला भाव देण्यास सज्ज आहे. बायप्रॉडक्टवर लक्ष केंद्रित करत १. १० लक्ष बल्क लिटर क्षमतेचा डीस्टलरी प्रकल्प पुढील हंगामात






कार्यान्वित करण्यात येणार आहे, त्यामुळे निधी उपलब्ध होईल आणि शेतकऱ्यांच्या ऊसाला जादा दर देताना अडचण येणार नाही. आपण राजकारणात शब्द पाळतो, आणि शब्द आपण खरा करुन दाखवला आहे. जयभवानी आपला हक्काचा कारखाना आहे, जयभवानीने शेतकऱ्यांना नेहमीच न्याय दिलेला आहे. ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगार, कर्मचारी आणि प्रशासन यांनी हातात हात घालून जय भवानीचा चालू हंगाम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे म्हणाले की, या हंगामात पाच लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवुन आम्ही काम करत आहोत. या हंगामात डिस्टिलरी, साखर कारखान्याचे मेंटेनन्सचे कामे पूर्ण झाले असून कारखाना सुरू झाल्यानंतर डिस्टीलरीचे उत्पादन ८ ते १० दिवसात सुरू होणार आहे. डिस्टीलरीकडील स्पिरीटचे उत्पादन प्रतीदिवस ४५ ते ४८ हजार बल्क लीटर होणार आहे. तसेच ७० ते ८० लाख बल्क लीटर स्पिरीट उत्पादनाचे उदिष्ट आहे. येणार्या या गळीत हंगामात उदीष्टापेक्षा जास्त गाळप करण्याचा मानस आहे. कारखाना शासनाने ठरविलेल्या तारखेला सुरू करणार आहोत. बायोगॅस सीएनजी, पोटॅश खत, इथेनॉल या सारखे बायप्रॉडक्टचे उत्पादन घेतल्यास आपल्याला स्पर्धेत टिकता येईल. लवकरच कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्याच्या व्यवस्थापणाच्या विचाराधीन आहे असेही ते म्हणाले. महंत ह.भ.प. शिवाजी महाराज यांचे यावेळी आशिर्वादपर भाषण झाले.

यावेळी कारखाना साईटवर पोहचलेल्या पहिल्या वाहन मालकाचा रोख रक्कम देवुन गौरव करण्यात आला. ट्रॅक्टरचे मालक गव्हाणे दत्तात्रय दगडू यांना ह.भ.प महंत शिवाजी महाराज यांच्या हस्ते रोख स्वरूपात पारितोषिक देण्यात आले. सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. याप्रसंगी कृषि उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती विकास सानप, ड परसूराम येवले, बिपिन डरपे, यांच्यासह संचालक सर्वश्री, जगन्नाथ शिंदे, संभाजीराव पवळ डॉ. आसाराम मराठे, संदीपान दातखीळ, जगन्नाथ दिवाण, कुमारराव ढाकणे, गणपत नाटकर, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, साहेबराव चव्हाण यांच्यासह, सुभाषराव मस्के, शांतीलाल पिसाळ, अशोक नाईकवाडे, विष्णुपंत घोंगडे सरपंच गढी, श्रीहरी पवार, यांच्यासह कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, शेतकी अधिकारी जगन्नाथ शिंदे, चीफ इंजीनियर अशोक होके, ऋषिकेश देशमुख, प्रॉडक्शन मॅनेजर गजानन वाळके, मुख्य लेखापाल सौरभ कुलकर्णी, परचेस ऑफिसर सोळुंके, संगणक प्रमुख धनाजी भोसले, डिस्टीलरी इन्चार्ज राजेंद्र बडे, सिव्हिल इंजिनियर भालचंद्र कुलकर्णी, सुरक्षा अधिकारी नारायण औटे, सचिन उधे, वचिष्ठ कुटे, सुदाम पघळ, ज्ञानेश्वर जामकर तसेच सर्व खाते प्रमुख, पदाधिकारी, ऊस बागायतदार, ऊस तोडणी ठेकेदार, कर्मचारी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हनुमाननगर (महादेव वस्ती) च्या मतदारांचा बहिष्कार; २५ वर्षांपासून रस्त्यासाठी घर घर

पात्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पात्रुड जवळ असलेले हनुमाननगर (महादेव वस्ती) येथील मतदारांनी येणाऱ्या २० तारखेला होणाऱ्या मतदानावर बहिष्कार टाकला आहे सविस्तर माहीत अशी की या वस्तीवर जाण्यासाठी रस्ता नसल्याने या वस्ती वरच्या शाळेतील विद्यार्थ्यांना जाण्या येण्यासाठी व येथील लोकांना येण्या जाण्या साठी पावसाळ्यात कसरत करावी लागत आहे या रस्त्या बदल अनेक वेळा तालुक्याचे आमदार प्रकाश दादा सोळंके, व जिल्हा परिषद सदस्य



पंचायत समिती सदस्य यांच्याकडे पाठपुरावा करून सुद्धा रस्त्याचे काम झालेले नाही अनेक वेळा रस्त्याबद्दल मागणी केली असता या लोकांनी या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे ही वस्ती पात्रुड ग्रामपंचायत हद्दीतील वार्ड क्रमांक (६) मध्ये येत आहे या वस्तीवर २०० मतदारांची संख्या असून या मतदारांनी येणाऱ्या निवडणुकीत मतदान न करण्याचा निर्णय घेतला आहे. माजलगाव तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी यांना निवेदन द्वारे माहिती देण्यात आली आहे.

## मतपेटी झाली तयार ;आष्टी मतदारसंघातील ४४० मतदार केद्रांसाठी यंत्रे केली सिल

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवणाऱ्या १७ उमेदवारांची नावे बुधवार (दि.१३) रोजी औद्योगिक महाविद्यालयात मतदान यंत्रात सील करण्यात आले.निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांचे नावे असलेली यंत्र सील करून ती स्टॉग रूममध्ये बंदोबस्तात ठेवण्यात आली असून,याठिकाणी बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी भेट देऊन पाहणी केली.




जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली भेट

आष्टी-२३१ विधानसभा मतदार संघातून एकूण १७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे.दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहेत.त्यासाठी प्रशासनाकडून आता अंतिम तयारी केली जात आहे.निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाल्यानंतर आज निवडणुक लढवणाऱ्या उमेदवारांच्या पत्रिका ईव्हीएम यंत्रात सिलिंगची प्रक्रिया पूर्ण केली. औद्योगिक महाविद्यालयात आष्टी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी भेट देऊन पाहणी करत योग्य त्या सुचना संबंधित अधिकारी-कर्मचारी यांना दिल्या.निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रातांधिकारी वसिमा शेख, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार वैशाली पाटील, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दत्तात्रय निलावाड यांच्या मार्गदर्शनाखाली व उमेदवार,त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत उमेदवारांच्या नावाच्या पत्रिका ईव्हीएम यंत्रात बंद करण्यात आल्या. मतदान पत्रिका ईव्हीएममध्ये लावल्यानंतर यंत्र सील करून स्टाँगरूमध्ये ठेवले.स्टॉगरूमला २४ तास पोलिस बंदोबस्तासह सीसीटीव्हीची नजर असणार आहे. १९ रोजी साहित्य वाटपाच्या दिवशीच आता स्ट्राँगरूम उघडणार आहे.तालुक्यात ४४० मतदार केंद्र आहे.त्याठिकाणी प्रत्येकी २ आणि १० टक्के राखीव असे एकूण बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट आज सील केले गेले.

## सिप्ला कंपनीकडून बालदिनानिमित्त लक्ष्मी हॉस्पिटल मधील बालकांना साहित्य वाटप

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जंतीनिमित्त धारूर शहरातील लक्ष्मी हॉस्पिटल मधील बालकांना विविध खेळांचे साहित्य वाटप करून मोठ्या उत्साहात साजरा केला.




भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु याची जयंती देशभरात बालक दीन म्हणून साजरी केली जाते धारूर शहरातील लक्ष्मी बाल रूगणल्यात सिप्ला कंपनी कडून पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या जयती निमित्त बालकांना व नातेवाइकांना मोफत खेळणी साहित्य व गिफ्ट वाटप करण्यात आले यावेळी सिप्ला कंपनीचे विश्वजीत पिसुरे व लक्ष्मी हॉस्पिटल चे बालरोगतज्ञ डॉ.नवनाथ चव्हाण व ईश्वर कदम उपस्थित होते .

## धनंजय मुंडे, क्षीरसागर,सोळंके,मुंदडा,पंडित यांना महात्मा फुले युवा दलाचा जाहीर पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

महात् मा फुले युवा दल बीड जिल्ह्याच्या वतीने विधानसभेच्या निवडणुकीत महात्मा फुले युवा दलाने बीड जिल्ह्यातील धनंजय मुंडे, योगेश क्षीरसागर, प्रकाश सोळंके, नमिता मुंदडा, विजयसिंह पंडित यांना मा.ना.अतुलजी सावे व महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख अॅड.सतीश शिंदे यांच्या आदेशावरून महात्मा फुले युवा दलाचे बीड जिल्हा प्रमुख अजय शिंदे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे



पुढे बोलताना अजय शिंदे म्हणाले की महात्मा फुले युवा दल गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रभर काम करत आहे बीड जिल्ह्यात महात्मा फुले युवा दलाचे गाव तिथे कार्यकर्ते आहे आम्ही सर्व उमेदवारांना मागणी केलेला आहे की येणार्या पुढील काळामध्ये माळी समाजाच्या कार्यकर्त्यांना न्याय द्या सर्व उमेदवारांनी शब्द दिलेला आहे की माळी समाजातील कार्यकर्त्यांना सामान्य माणसांना आम्ही न्याय देऊ म्हणून महात्मा फुले युवा दल बीड जिल्ह्यातील वरील सर्व उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिलेला आहे तरी महात्मा फुले युवा दलाचे उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, तालुका उपप्रमुख तसेच सर्व महात्मा फुले युवा दलाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी वरील उमेदवारांना विजयी करा असे आव्हान अजय शिंदे यांनी केले आहे.

## हनुमंत निळे यांची राष्ट्रवादी युवक तालुका सरचिटणीस पदी निवड

**घाटनांदुर । प्रतिनिधी**

जवळ असलेले चौथेवाडी येथील युवक हनुमंत कचरू निळे यांची वाल्मीक अण्णा कराड, सूर्यभान मुंडे,मा. जि.प.सदस्य शिवाजी शिरसाठ ,सरपंच महेश गारटे , युवा नेते बाळासाहेब देशमुख, प्रदीप वैद्य ,चौथेवाडीचे सरपंच महादेव निळे यांच्या उपस्थितीत घाटनांदुर येथे १३ नोव्हेंबर रोजी परळी विधानसभा महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे साहेब यांच्या प्रचारार्थ युवा संवाद मेळाव्याला आले असता हनुमंत निळे यांची राष्ट्रवादी युवक तालुका सरचिटणीस पदी निवड व



नियुक्तीपत्र देऊनत्यांना शुभेच्छा देण्यात आल्या हनुमंत निळे यांच्यासह बालासाहेब निळे , राजेभाऊ निळे, रामदास निळे, राधाकिसन भंडे ,संदीप जाधव,श्याम निळे, हरी निळे ,गणेश निळे, विजय निळे , सेवक सोनवणे, यांच्यासह अनेक चौथेवाडी येथील युवकांनी अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यात आला.

## इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या दोन राज्यस्तरीय पुरस्कारांनी सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या वतीने दिला जाणारा व अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा राज्यस्तरीय डॉ.सुरेश नाडकर्णी व आय.एम.ए.एम.एस प्रेसिडेंट ॲप्रेसिएशन अवॉर्डस फॉर बेस्ट कल्चरल ॲक्टिव्हिटी या पुरस्काराने येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांना नुकतेच ठाणे येथे संपन्न झालेल्या आय.एम.एच्या मॅस्टेकॉन परिषदेत सन्मानित करण्यात आले. डॉ सुरेश नाडकर्णी हा अत्यंत प्रतिष्ठेचा बहुमान तीन वेळा प्राप्त करणारे डॉ.इंगोले हे महाराष्ट्रातील पहिलेच डॉक्टर ठरले आहेत. हे विशेष उल्लेखनीय आहे.

तसेच सांस्कृतिक समितीचा महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपद भूषवितांना त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी पुणे येथे साहित्यिक डॉक्टर्ससाठी पहिल्यांदाच शब्दशारदा साहित्य संमेलन भरवले होते. तसेच त्यांनी गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, रिल्स स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,नाट्य स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा, अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करून महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्स साठी एक सशक्त व्यासपीठ निर्माण करून वैद्यकीय क्षेत्रात सांस्कृतीक चळवळ गतिमान केली. त्यांच्या या उल्लेखनिय कामगिरीबद्दल त्यांना इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या राज्यकार्यकरनी तर्फे वरील दोन्ही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या अभिनमानस्पद कामगिरीबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून







ठाणे येथे शानदार कार्यक्रमात पुरस्कार सोहळा संपन्न

स्वागत व अभिनंदन होत आहे. या पुरस्कारांबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, इंडीयन मेडीकल असोसिएशनचा अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जाणारा राज्यस्तरीय डॉ.सुरेश नाडकर्णी या पुरस्काराने मला यावर्षी ही राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेत नुकतेच सन्मानित करण्यात आले. मला हा पुरस्कार तिसऱ्यावेळी प्राप्त झाला आहे. याचे श्रेय मला नेहमीच तोलामोलाची साथ व सहकार्य देणारे डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, डॉ.विजय लाड, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.योगेश मुळे, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.श्रीनिवास रेड्डी यांच्यासह जेष्ठ मार्गदर्शक डॉ.सुधीर देशमुख, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.एन.पी.देशपांडे, डॉ.उत्तम निसाले, डॉ.शैलेश वैद्य, यांच्यासह सर्व आयएमएच्या जेष्ठ आणि श्रेष्ठ साथीदारांचे आहे. हा पुरस्कार मी त्यांना समर्पित करतो. सांस्कृतीक समितीचा सर्वोत्कृष्ट समिती अध्यक्ष पुरस्कार या कार्यात मला साथ देणाऱ्या सांस्कृतीक समिती सदस्य डॉ.गीतांजली शर्मा, डॉ.तुकाराम मुंढे, डॉ.मोहिनी गानू, डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ.राजश्री सावंत, डॉ.माया भालेराव, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.प्रफुल्ल जटाळे, डॉ.राजन जोशी, डॉ.वैष्णवी पाटील, डॉ.पल्लवी दोडके, डॉ.सारंग दराडे यांना समर्पित करतो. आयएमए अंबाजोगाई शाखेचा अध्यक्ष झाल्यावर इंडीयन मेडीकल असोसिएशनचे दोनदा बेस्ट प्रेसिडेंट, दोनदा बेस्ट ब्रँचचा, एकदा बेस्ट सोशिअल सेक्युरिटी मेंबर्स ड्राईव्ह आणि दोनवेळा डॉ.सुरेश नाडकर्णी हे पुरस्कार मिळाले आहेत. हे यश माझ्या विविध संकल्पनांना मूर्त स्वरूप देणाऱ्या सर्व साथीदारांचे आहेत त्यांचे मनःपूर्वक आभार. असेच कार्य पुढे करीत राहील अशी आपणांस ग्वाही देतो. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. पुरस्कार वितरणाचा शानदार भव्य कार्यक्रम ठाणे येथे डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात संपन्न झाला. हा पुरस्कार इंडीयन मेडीकल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.टी.असोकन, राष्ट्रीय सचिव डॉ.अनिल कुमार नायक, महाराष्ट्र मेडिकल असोसिएशनचे प्रशासकीय अधिकारी डॉ विकी रूघवणी, माजी अध्यक्ष डॉ.अग्रवाल, राज्याध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे, राज्यसचिव डॉ.सौरभ संजनवाला यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.संतोष कदम ,डॉ.रवींद्र कुटे, डॉ.रामकृष्ण लोंढे, डॉ.संतोष कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. मिळालेल्या पदाला झोकून देऊन कार्य करण्याची डॉ.राजेश इंगोले यांची शैली त्या पदाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवते. तसेच त्या पदाला वलय प्राप्त करून देतेव त्या पदाला डॉ.इंगोले योग्य न्याय देतात असे मत राष्ट्रीय सचिव डॉ.अनिलकुमार जे नायक तसेच सर्व राज्याच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

राज्य लोकतंत्र
महासंग्राम
शुक्रवार, दि.१५ नोव्हेंबर २०२४
६

# विकासाचा घेतलेला वसा कधीच सोडणार नाही -धनंजय मुंडे

## आम्ही दोघे बहीण-भाऊ मिळून विकासाची शेती मतदारसंघात फुलवणार - आ.पंकजाताई मुंडे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**जातीपातीच्या राजकारणाला थारा न देता केवळ विकासाचं आणि सर्वसमावेशक राजकारण करण्याची आम्हाला शिकवण आहे आज आम्ही दोघे बहिण भाऊ एक आहोत त्यामुळे आता आमची विकास कामे करण्याची शक्ती देखील दुप्पट झाली आहे. मी कधीही उठणार नाही मारणार नाही आणि जनतेच्या विकासाचा घेतलेला वसा कधीही सोडणार नाही फक्त कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथे आयोजित सभेतून केले आहे.**

मागील निवडणुकीत या भागातील विकासासाठी दिलेल्या प्रत्येक शब्दाची पूर्ण पूर्तता करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला काही कामे मंजूर आहेत काही कामांची सुरुवात झाली आहे विकासाचा उर्वरित अनुशेष येणाऱ्या काळात आपण भरून

### बरदापुर येथे धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेतून धनंजय मुंडेंच्या विजयाची वाट सुकर

### डॉ.प्रीतमताई मुंडे, मा.आ.संजय भाऊ दौंड यांनीही थोडक्यात मांडला परळीच्या विकासाचा नकाशा

काढू. आणि ग्रामस्थांच्या मागणीनुसार तुळजाभवानीचे मंदिर विकसित करण्यासाठी आवश्यक तो सर्व निधी उपलब्ध करून देऊ असेही यावेळी धनंजय मुंडे यांनी सांगितले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथे धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ आज धनंजय मुंडे यांच्यासह आमदार पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे, माजी आमदार संजय भाऊ दौंड यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.आज





मी माझ्या भावाच्या प्रचारासाठी इथे आले आहे यावेळी आपल्याकडे कमळ नसून घड्याळ आहे त्यामुळे आठवणीत ठेवा घड्याळाचे बटन दाबायचे आहे. आम्ही दोघे एकत्र आलो म्हणून आज अनेक जण ढोंग करत आहेत. आम्ही स्वर्गीय मुंडे साहेबांच्या शिकवणी आजवर काम करत आहोत आणि पुढेही तुम्ही शाबासकीची थाप द्याल असे काम दोघे बहिण भाऊ मिळून करून दाखवू मात्र माझ्या मतांनी माझ्या भावाला मतदानाची भेट तुम्ही सर्वजण द्या असे आवाहन यावेळी बोलताना आमदार पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

लोकसभेत झालेल्या पराभव विसरून आता पुढे जाऊ यापुढे पराभव होईना होऊ द्यायचा नाही असा निश्चय करू माझ्या भावाच्या सोबतीने मीही आता पुढाकार घेतला आहे की तो उपस्थित सर्व माता-भगिनी या लाडक्या बहिणी आहेत त्या लाडकी बहीण योजना आणणाऱ्या महायुतीच्या पाठीशी नक्कीच उभा राहतील असाही मला विश्वास असल्याचे पुढे बोलताना पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.

यावेळी माजी खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे तसेच माजी आमदार संजय भाऊ दौंड यांनीही आपले मनोगत व्यक्त करत येत्या २० तारखेला धनंजय मुंडे यांनाच प्रचंड बहुमतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. या सभेस संजय भाऊ दौंड यांच्यासह तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, श्याम आपेट, अविनाश मोरे, विलास बापू मोरे, शिवाजीराव शिरसाट, वसंतराव कदम, प्रशांत पाटील, राडकर, सुधाकर शिंगारे, मुक्तार देशमुख, विश्वनाथ जानकर, उत्तम जानकर, शिवाजी बाप्पा मोरे, काळम ताई, सरपंच विकास पाटील, लिंबराज धुमाळ, विठ्ठल कोकरे, अजितदादा गरड, रामलिंग चव्हाण, जावेद भाई, गौस हाश्मी, बाबू पटेल, बंडू शिंदे, दिगंबर चव्हाण, पांडू तात्या हारे, नाना भगत यांसह आदी उपस्थित होते. या जाहीर सभेस बर्दापूर सह पंचक्रोशीतील जनतेने प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थिती लावल्याचे पाहायला मिळाले.

# आष्टी मतदारसंघात सुरेश धसांचाच बोलबाला! सर्वसामान्य मतदारांनी उचलला विजयाचा विडा

**आष्टी । प्रतिनिधी**

मतदारसंघातील जनता आणि सुरेश धस हे एक समीकरण आहे.अडचण म्हटले की आपोआप धसांचे नाव सर्व सामान्य जनतेच्या ओठावर येते.याच जोरावर मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर विकासकामे करून जनतेच्या मनात घर तयार केलेल्या सुरेश धस याचाच बोलबाला असल्याचे दिसुन येत आहे.

२३१ आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टी,शिवसेना,रिपाई (आठवले





सुरेश धस यांच्या प्रचार दौऱ्यात मिळत असलेला प्रतिसादाने वातावरण बदललं

गट) व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार सुरेश रामचंद्र धस याचे चिन्ह कमळ आहे.सुरेश धस गेल्या अनेक वर्षांपासून मतदारसंघात विकासासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.याच जोरावर तीन वेळा आमदार, तर एक वेळी राज्यमंत्री असताना मतदारसंघात विकासाची गंगा आणली,सर्व सामान्य जनतेच्या गैरसोयी दुर करून सोयीसुविधाचा लाभ दिला.शेतकऱ्यांचे प्रश्न पोटतिडीकीने शासन दरबारी मांडून ◀◀ पान ३ वर

# कितीही नेते एकत्र आले तरी मतदार तुतारीकडेच- आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केला विश्वास

**बीड । प्रतिनिधी**

जनतेने कायम आपला लोकप्रतिनिधी म्हणून स्वीकारावे असे काम करावे लागते. केवळ पोपटपंची करुन विकासकामे मार्गी लागत नसतात. त्यासाठी जनतेत मिसळून त्यांचे प्रश्न समजून घेवून ते मार्गी लावण्यासाठी सरकार दरबारी पाठपुरावा करावा लागतो.आता निवडणूक तोंडावर आली की, माझे विरोधक नेते एकत्र येवून माझ्या पराभवाची स्वप्न पाहू लागले आहेत,मात्र हे नेते कितीदाही एकत्र आले,अन्? बळजबरीने माझ्या विरोधात



निवडणूकीत कामाला लागले तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही.कारण बीड मतदारसंघातील सुज्ञ मतदार येत्या २० नोव्हेंबर रोजी तुतारी वाजवणार्या माणसालाच मतदान करणार आहेत. त्यामुळे आपणही विरोधकांची बिनबुडाची पोपटपंची बंद करण्यासाठी येत्या बुधवारी मतदान यंत्रावरील अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मला पुन्हा एकदा विजयी करावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

बीड मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांनी त्यांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि.१३) शहरातील विविध भागातील नागरिकांच्या गाठीभेटी घेत प्रत्यक्ष संवाद साधला. यावेळी आयोजीत मतदार संवाद बैठकीत ते बोलत होते.या प्रसंगी माजी आमदार सय्यद सलीम,जावेद कुरेशी, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्यासह पदाधिकारी,

◀◀ पान ३ वर

# डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी बीड शहर आणि परिसर पिंजून काढला



**बीड । प्रतिनिधी**

दिवसेंदिवस विधानसभेची निवडणूक जवळ येत असून प्रचाराने जोर धरला आहे. बीड विधानसभेचे राष्ट्रवादी-शिवसेना- भाजपा आणि मित्रपक्षांच्या महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी बीड शहर आणि परिसर अक्षरशः पिंजून काढला असून त्यांना विशेषतः महिला वर्गातून उदंड प्रतिसाद मिळत आहे. प्रत्यक्ष गाठीभेटी, बैठका, कॉर्नर बैठका, वेगवेगळ्या रॅली, वैयक्तिक भेटी यांच्या माध्यमातून त्यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.

पूर्वेकडील भाग असलेल्या चांदणे वस्ती, रमाई नगर, सुरसंगम कॉलनी या भागापासून ते शहराच्या पश्चिमेस आऊटसायटेड असलेल्या गोरे वस्ती पर्यंतचा दौरा त्यांनी केला. या प्रचार दौऱ्यादरम्यान त्या म्हणाल्या, की येणाऱ्या काळात बीड विधानसभेच्या सर्वांगिण विकासासाठी सुशिक्षित, सज्जन, सात्विक, आणि विकासाची दृष्टी असलेल्या उमेदवाराला आपल्याला निवडून द्यायचे आहे आणि असे एकमेव उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर आहेत. त्यांनी कधीही गुंडगिरी, जातीयवाद, धर्मवाद केला नाही. सर्वधर्मसमभावाच्या तत्वाचे ते पुरस्कर्ते आहेत. आजवर डॉ.भारतभूषण यांनी बीड शहराची लोकप्रतिनिधी म्हणून सेवा केली. त्यांचाच वसा घेऊन योगेश पुढे काम करताहेत. डॉ.सारिकाताई देखील त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. दोघांनी मिळून बीड विधानसभा क्षेत्राच्या कायापालटाचा विडाच उचलला आहे. हे महायुतीचे सरकारही जनकल्याणासाठी कटीबद्ध आहे. विशेषत: महिला आणि विद्यार्थीनींसाठी या महायुतीच्या शासनाने सुरू केलेल्या योजना कल्याणकारी योजना ठरत आहेत. महिलांना अर्ध्या प्रवास भत्त्यात प्रवास, शेतकरी सन्मान निधी योजना, बेरोजगार युवक आणि युवतींसाठी रोजगार उपलब्धीची हमी, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि मोफत वीज अशा कितीतरी योजना प्रत्यक्षात सुरू केल्या आहेत. या योजना पुढे अशाच सुरू ठेवण्यासाठी आपल्याला येत्या २० तारखेला घड्याळ या चिन्हावर मतदान करून योगेश क्षीरसागर यांना भरघोस मतांनी विजयी करायचे आहे असे आवाहन त्यांनी या दौऱ्यामधून केले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# योगेशभैय्यांना आमदार करण्याचा भगींनीनी केला निर्धार -जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

स्व. काकु नंतर राजकारणाच्या माध्यमातून पालकमंत्री म्हणून आण्णासाहेब आणि नगराध्यक्ष म्हणून अध्यक्षसाहेबांना प्रदीर्घ काळ बीडच्या जनतेने लोकप्रतिनिधी म्हणून सेवेची संधी दिली तोच सेवेचा वसा आणि वारसा घेऊन तिसऱ्या पिढीतील शांत संयमी मितभाषी डॉ. योगेशभैय्या भारतभूषण क्षीरसागर महायुतीचे उमेदवार म्हणून बीड विधान सभा मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी जुने जाणते आण्णा आणि अध्यक्षांचे कार्यकर्ते कामाला लागले असून विशेष करून ज्येष्ठ नगरसेविकासह युवा आणि ज्येष्ठ भगींनीनी बीड शहर आणि ग्रामीण भागही डोअर टु डोअर, कॉर्नर मिटिंग, रॅलीच्या माध्यमातून पिंजून काढत योगेशभैय्याला आमदार करण्यासाठी कामाला लागलेल्या आहेत.

# आ.कैलास गोरंटयाल यांची प्रचारात जोरदार मुसंडी : गाव तेथे मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनीधी**

जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी प्रचारात जोरदार मुसंडी मारली आहे.प्रत्येक गावात मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मोठया मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार केला जात आहे.



जालना विधानसभा मतदार संघात असलेल्या एकूण ७२ गावांपैकी इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांनी आतापर्यंत जवळपास ६० गावांना भेटी दिल्या असून त्यात प्रामुख्याने इंदेवाडी, अंतरवाला, कुंबेफळ, देवमुर्ती, वाघ्रूळ जहागीर, जामवाडी, पानशेंद्रा, श्रीकृष्ण नगर, रामनगर, मौजपूरी, साळेगावं, सावरगाव हडप, भिलपूरी, बाजीउम्रद तांडा, पाहेगाव तांडा, जैतापूर, धांडेगाव तांडा आदी गावांचा समावेश आहे. प्रत्येक गावात डोअर टू डोअर प्रचार करत आ.कैलास गोरंटयाल यांनी थेट महीला, पुरुष आणि युवक मतदारांशी संवाद साधला. कॉर्नर सभा, गावातील पारांवर आयोजित व्यापक बैठकांच्या माध्यमातून गोरंटयाल यांनी मागील पाच वर्षात केलेल्या विकास कामांचा आढावा उपस्थीत मतदारांसमोर मांडत भविष्यात जालना मतदार संघाचा कायापालट करण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत विजयी करण्याचे आवाहन ते मतदारांना करत आहेत. विविध गावात आयोजित सभांमधून जालना सहकारी साखर कारखान्याचा मुद्दा प्रभावीपणे मांडून आ. गोरंटयाल हे आपले प्रतिस्पर्धी उमेदवार अर्जुन खोतकर यांच्यावर टीकेची तोफ डागत आहेत. एकूणच मतदार संघातील या प्रचार दौऱ्यात महाविकास आघाडीचे उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी जोरदार मुसंडी मारली ◀◀ पान ३ वर

# शिवसेना उबाठा गटाच्या असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**परळी । प्रतिनिधी**

**राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे विकासपुरुष ना. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाला बळकटी देण्यासाठी आणि विधानसभा निवडणुकीत पुन्हा धनंजय मुंडे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त करत शिवसेना उबाठा गटाच्या असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.**

वडार कॉलनी येथील शिवसेना उबाठा गटाचे युवा नेते उमेश देवकर यांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांनी ना. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आज या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यामध्ये उमेश देवकर यांच्यासह गणेश देवकर, आकाश



धनंजय मुंडे यांच्या विजयासाठी काम करण्याचा निर्धार

हुलगुंडे, किरण शिंदे, दिनेश धोत्रे, संजय पवार, सोनू देवकर, विशाल देवकर, संदीप चौधरी, मारुती धोत्रे, अरुण देवकर, उमेश देवकर, कृष्णा इटकर, सारांश चव्हाण, महादू देवकर, सुरेश विटकर रवी मंजुळे, विलास पवार, आकाश देवकर, अनिल जाधव, श्रीनाथ चव्हाण, सुभाष कुऱ्हाडे, अविनाश कुऱ्हाडे, सुरेश कुराडे, लक्ष्मण देवकर, नर्सिंग शिंदे, विशाल मते, सचिन चव्हाण, विलास चव्हाण, समाधान धनवटे, गणेश घनवटे,

◀◀ पान ३ वर

# डॉ.योगेश क्षीरसागरांना विविध संघटनांच्या पाठिंब्याचा ओघ सुरूच

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघात घडाळ्याचा गजर सुरुच असून दरदिवशी प्रवेश सोहळ्यांसह विविध संघटना, प्रतिष्ठित व्यक्तींचा उमदेवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना पाठींबा लाभत आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्या सभेनंतर अनेकांचे गुरुवारी (दि.१४) समर्थन लाभले. अल्पसंख्याक समाजातील प्रतिष्ठित नागरिकांसमवेत राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलची बीडमध्ये पक्ष कार्यालयात बैठक झाली. यावेळी डॉ.क्षीरसागर यांच्या पाठिशी ठामपणे उभे राहण्याचा निर्णय झाला असून हा अल्पसंख्याक समाजाला गृहीत धरणाऱ्या विरोधकांसाठी मोठा धक्का आहे.

डॉ.योगेश क्षीरसागर यांना सर्वस्तरातून समर्थन मिळत आहे. अल्पसंख्याक समाजासोबतच मोची समाजबांधवांनी पाठिंबा दिला असून दोन्ही समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. तिकडे बीडच्या आदर्श मार्केट असोशिएशनच्या पदाधिकार्यांसोबत बैठक पार



पडली. या बैठकीतून व्यापारी बांधवांनी सोबत असल्याचा विश्वास दिला. रिपाइंचे (एकतावादी) राष्ट्रीय नेते नानासाहेब इंदीसे यांच्या आदेशावरून जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे आणि मातृभूमी प्रतिष्ठान, ओबीसी महासंघाचे बीड शाखा अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांच्यासह सहकार्यांनी पाठिंब्याचे पत्र दिले. दरम्यान बैठका, पाठिंबा अन्? प्रवेश सोहळ्यांचे सत्र सुरुच होते. या सर्व ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# खुर्चीचा आणि सत्तेचा मोह नाही. मात्र, मी शब्द देतो, मी महाराष्ट्राचं भलं करील

**हडपसर । प्रतिनिधी**

पुणे शहरासह संपूर्ण राज्याचा राजकारण्यांनी विचका करून ठेवला आहे. जातीपातींमध्ये भांडणे लावून सामान्य माणसाला भेडसावणाऱ्या प्रश्नांवरून लक्ष विचलीत करण्याची व्यवस्था राजकारण्यांनी केली आहे. छत्रपतींनी निर्माण केलेले आणि आम्ही हरवलेले राज्याचे गतवैभव मला आणायचे आहे. त्यासाठी मला तुमची साथ हवी आहे. संधी वारंवार येत नाही. मनसे आणि राज ठाकरे पर्याय आहे. मला खुर्चीचा आणि सत्तेचा मोह नाही. मात्र, मी शब्द देतो, मी महाराष्ट्राचं भलं करील. असे प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे हडपसर मतदारसंघातील उमेदवार साईनाथ बाबर यांच्या प्रचारार्थ हडपसर येथे आयोजित केलेल्या प्रचारसभेत ते बोलत होते.



उमेदवार साईनाथ बाबर, अनिल शिदोरे, बाबु वागसकर, शिवाजी भाडळे, प्रतिक वाघे आदी यावेळी उपस्थित होते. राज ठाकरे म्हणाले, नागरिकांना काय हवे याचा विचार न करता आपल्याला काय हवे, हेच लक्षात ठेवून हडपसरमधील राजकारण्यांनी येथील विकास खुंटवला आहे. आपले जुने गावच बरे होते, असे आज नगरिकांना वाटते. महापालिकेत ही गावी समाविष्ट का झाली असा सवाल विचारला जात आहे. हडपसरमध्ये रस्ते नाहीत. वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त आहेत. सामान्य नागरिकांना महिलांना मुलांना शाळेत पाठविण्यास भीती वाटते. महिलांना कायम धाकधूक वाटत असते. येथील राजकारण्यांनी केवळ जाती जातींमध्ये द्वेष पसरविला आहे. वातावरण चांगले दिवस आणणारे नक्कीच नाही. राज्यालाही हे वातावरण घातक आहे.' या परिसरात शाळांमध्ये सामान्यांना प्रवेश नाहीत, रुग्णालये नाहीत, महिलांना सुरक्षित वातावरण नाही, मुलींवर अत्याचार होत आहेत. मुंबईचा विचका होण्यास काही काळ गेला. मात्र, पुण्याचा विचका होण्यास वेळ लागला नाही. शहरांना आकार देताना लोकांचा विचार करणे गरजेचे आहे. सध्या विकासाच्या नावाखाली केवळ नव्या कंत्राटदारांना कामे देऊन त्यांच्याकडून केवळ टक्क्यांची वसुली केली जात असल्याचा घनाघात ठाकरे यांनी यावेळी केला.

२०१४ मध्ये मनसेने राज्याचा विकास आराखडा तयार केला होता. यापूर्वी कोणत्याही पक्षाने एखाद्या राज्याचा विकास आराखडा तयार केला नव्हता. त्यामुळे माझ्या मनातील महाराष्ट्र घडवण्यासाठी एक हाती सत्ता द्या, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. मला खुर्चीचा सोस नाही, मुख्यमंत्री माझ्या घरातील करावा, हा विचार देखील नाही. मात्र शिवछत्रपती यांनी दिलेले वैभव परत मिळवण्यासाठी मनसेला निवडून द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# पवारांना नोटीस पाठवणाऱ्या चिल्लर आमदाराला जनताच जागा दाखवेल; बापू पठारेंचा हल्लाबोल

**पुणे । प्रतिनिधी**

पोर्शे प्रकरणावरून बदनामी करू नये, यासाठी वडगाव शेरीचे (तरवसरेप डहशीळ) विद्यमान आमदार सुनील टिंगरे (डींपळश्र ढळपसीश) यांनी सर्वच राजकीय पक्षांना नोटीस पाठवली होती. खासदार सुप्रिया सुळे यांनी वडगाव शेरीच्या सभेत याचा खुलासा केला होता. चक्क सुनील टिंगरे यांनी शरद पवारांनाच नोटीस पाठवल्याचे सांगितले होते. ही बाब समोर आल्यानंतर आमदार सुनील टिंगरे यांच्यावर चहुबाजूने टीका होत होती. त्यानंतर आता वडगाव शेरीचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बापूसाहेब पठारे यांनी सुनील टिंगरे यांच्यावर जोरदार टीका केली. शरद पवारांना नोटीस पाठवणाऱ्या चिल्लर आमदाराला आता जनताच जागा दाखवेल, असे बापू पठारे यांनी म्हटलंय.

विश्रांतवाडी येथील भाजपच्या माजी नगरसेविका रेखा टिंगरे आणि चंद्रकांत टिंगरे यांनी आज शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी बापू पठारे हे देखील उपस्थित होते. यावेळी बोलताना बापू पठारे म्हणाले, पात्रता नसतानाही त्यांनी शरद पवारांना नोटीस पाठवली. आता वडगाव शेरीतील नागरिकच त्यांना त्यांची पात्रता दाखवून देतील. शरद पवार ईडीच्या नोटिसीला देखील घाबरले नाहीत. त्यामुळे एखादा चिल्लर आमदार जर त्यांना नोटीस पाठवत असेल तर जनताच त्यांना जागा दाखवेल. दरम्यान, दरम्यान आमदार सुनील टिंगरे त्यांच्या दादागिरीला परिसरातील नागरिक घाबरले आहेत. कुणीही समोर येऊन बोलण्यास तयार नाही. त्यांच्या या दादागिरीला कंटाळल्याने संपूर्ण टिंगरे कंपनी आणि गाव माझ्यासोबत आहे. रेखा टिंगरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात केलाय आणि त्या आता त्यांच्या भागातून मला सर्वाधिक मताधिक्य मिळवून देतील. आमदार टिंगरेंच्याच भागातून मला सर्वाधिक मताधिक्य मिळाल्याचं निकालाच्या दिवशी कळेल, असाही विश्वास बापूसाहेब पठारे यांनी व्यक्त केला



# गार 'वडापाव' दिल्याने विक्रेत्याला मारहाण; पुण्यातील धक्कादायक प्रकार

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पुण्यातील वेगवेगळ्या भागातून गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत आहेत. अशातचं आता 'वडापाव'वरून स्नॅक्स सेंटर चालकाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. वडापाव अन् पुण्याचे नाते वेगळेच असून, बालेवाडी परिसरात हा प्रकार घडला आहे.



वडापाव गार असल्याने तिघांनी विक्रेत्यावर काचेची भरणी फेकून मारत चहाचा थरमास फेकून देत तोडफोड केल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी बाणेर पोलीस ठाण्यात प्रकाशचंद्र शंकरलाल जोशी (वय ४५, रा. बालेवाडी) यांनी तक्रार दिली आहे. यानूसार अंकुश कोंडीबा ढेबे (वय २३) याच्यासह त्याच्या दोन मित्रांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, जोशी यांचे बालेवाडी परिसरातील साईचौक येथे शिवकृपा स्नॅक्स सेंटर आहे. त्याठिकाणी दुपारी बाराच्या सुमारास ढेबे व त्याचे दोन मित्र सेंटरवर आले होते. त्यांनी वडापाव मागितला. वडापाव दिल्यानंतर तो गार आहे, यावरून वाद घातला. वादाचे रुपांतर भांडणात झाले. त्यावेळी आरोपींनी दुकानातील चहाचा थरमास खाली फेकून तो फोडला. तर ढेबे याने काऊंटरवरील काचेची भरणी हातात घेऊन ती जोशी यांच्या दिशेने फेकूम मारली. यात त्यांच्या डोक्याला व हाताला मार लागला आहे. त्यानंतर तिघेही तेथून पसार झाले. गार वडापाववरून मारहाण झाल्याने परिसरात चांगलीच चर्चा रंगली होती. पुढील तपास बाणेर पोलीस करत आहेत.




# सकल मराठा समाजाचा शनिवारी मेळावा

**पुणे । प्रतिनिधी**

मराठा समाज विकास संघटनेतर्फे सकल मराठा समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती संघटनेचे समन्व्यक बाळासाहेब अमराळे, रविंद्र माळवदकर, विराज तावरे, तुषार काकडे, प्राची दुधाने, विशाखा भालेराव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा मेळावा शनिवार दि १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता शुक्रवार पेठेत सुभाष नगर जवळ छत्रपती शिवाजी मराठा हायस्कूल येथे होणार आहे. या मेळाव्यात मराठा आरक्षणविषयीं निर्णय प्रलंबित आहे. त्याविषयी भूमिका घेणे.सारथी संस्थेच्या कामांसाठी १ हजार कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, यू पी एस सी व एम पी एस सीच्या विध्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्या त्वरित मान्य कराव्यात. मराठा समाजाच्या मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घ्यावेत.मुंबईत अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक व पुतळा उभारण्याची योजना प्रलंबित आहे ही योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत. सर्व समाजाची जनगणना करण्यात यावी. मराठा समाजातील विध्यार्थ्यांसाठी राज्यात प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह बांधावे. आदी मागण्यांविषयी चर्चा करण्यात येणार आहे. या मेळाव्यास पुणे जिल्ह्यातील मराठा समाजातील समविचारी शैक्षणिक क्षेत्रातील, सामाजिक, संस्थामधील कार्यकर्ते, गणेश मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# भोर मतदारसंघात काँग्रेसला धक्का
## सतीश चव्हाणांच्या हातावर अजितदादांचे घड्याळ

भोर । प्रतिनिधी

ऐन विधानसभा निवडणुकीत भोर मतदारसंघात काँग्रेसला जोरदार धक्का बसलाय. भोरचे काँग्रेसचे माजी पंचायत समिती सदस्य सतीश चव्हाण यांनी काँग्रेसला रामराम करत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये झालेल्या जाहीर सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत हा प्रवेश पार पडला. सतीश चव्हाण यांच्या प्रवेशामुळे भोर विधानसभेत काँग्रेसला मोठा झटका बसला आहे. तालुक्याचा रखडलेला विकास यामुळे चव्हाण यांनी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. त्यांच्या या निर्णयामुळे भोर, राजगड या दोन तालुक्यांत महायुतीचे उमेदवार शंकर मांडेकर यांचे पारडे जड होणार आहे. सलग पंधरा वर्षे मतदार संघातील सत्ता असतानाही काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे.या नाराजीला वाट करून देत चव्हाण यांनी अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश केलाय. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भोरमध्ये होणार्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाहीर सभेत काँग्रेस मधील कार्यकर्त्यांचा मोठा गट राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये जाहीर प्रवेश करणार आहे. त्यामुळे या निवडणुकीत भोर विधानसभेत परिवर्तन नक्की होणार, असे महायुतीचे पदाधिकारी सांगत आहेत

# आमदार दिलीप मोहिते-पाटील यांच्यावर शरद पवारांची जोरदार टीका

**खेड । प्रतिनिधी**

शरद पवार यांनी आपल्या भाषणात आमदार दिलीप मोहिते-पाटील यांचे नाव न घेता खरपूस समाचार घेतला. या तालुक्याचा नावलौकिक खूप चांगला होता. येथून अनेक चांगले खासदार, आमदार निवडून गेले. पण आमची चूक झाली व तीन टर्म आम्ही येथील नेतृत्वाला निवडून दिले. आता ही चूक करू नका. तालुक्याला, जिल्ह्याला प्रकाशाची वाट दाखविण्यासाठी उध्दव ठाकरे यांनी बाबाजी काळे यांच्या हातात मशाल दिली असून, २० नोव्हेंबरला मशालीसमोरील बटण दाबून परिवर्तन घडवून आणा, असे आवाहन देखील शरद पवार यांनी केले.

हुतात्मा राजगुरू, निवृत्त सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्यासारख्या अनेक कर्तृत्ववान लोकांमुळे खेड तालुकाचा नावलौकिक देशाच्या कानाकोपर्यात पोहचला. पण येथील नेतृत्वाने दहशतवाद व दमदाटी करत



तालुक्यातील सर्व उद्योगधंदे करणाऱ्यांना हैराण करत दूषित वातावरण निर्माण केले. पण बाबाजी काळे यांच्या रूपाने सर्वांना बरोबर घेऊन जाणारे सुसंस्कृत नाव आमच्यापुढे आले. त्यामुळे उध्दव ठाकरे आणि आम्ही त्यांची उमेदवारी जाहीर केल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांनी येथे स्पष्ट केले. खेड-आळंदी विधानसभेचे शिवसेना (उबाठा) पक्षाचे अधिकृत उमेदवार बाबाजी काळे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची राजगुरुनगर येथील बाजार समितीच्या आवारात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती, या वेळी ते बोलत होते. या प्रसंगी महाविकास आघाडीचे नेते जगन्नाथ शेवाळे, प्रकाश म्हस्के, सचिन अहिर, अशोक खांडेभराड, भगवान वैराट, मनीषा गोरे, अतुल देशमुख, सुधीर मुंगसे यांच्यासह सर्व पदाधिकारी, नेते व्यासपीठावर हजर होते.

या वेळी सचिन अहिर यांनी सांगितले, तीन महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीत संभ्रम होता पण आता सर्व एकसंघ झाले असून, परिवर्तन नक्की होणार आहे. कारण राज्याचा तरुण संघर्षयोध्दा शरद पवार यांचा आशीर्वाद आपल्या उमेदवाराला मिळाला आहे. येथील आमदाराला मंत्रिपदाचे डोहाळे लागले असून, राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार सत्तेत येणार असल्याने त्यांचे स्वप्न पूर्ण होणार नाही. दरम्यान शरद पवार यांची सभाच होऊ नये म्हणून आमदाराने अनेक प्रयत्न केले. कारण शरद पवार यांची सभा झाली तर आपला पराभव निश्चित होणार हे त्यांना माहिती आहे. खेड तालुक्यात आजही शरद पवार व उध्दव ठाकरे यांना मानणारा प्रचंड मोठा वर्ग आहे. शरद पवार यांचे पाऊल माझ्या सभेला लागले, तिथेच माझा विजय निश्चित झाल्याचा विश्वास बाबाजी काळे यांनी व्यक्त केला.

# खेड-आळंदी मतदारसंघात राष्ट्रवादी विरूध्द राष्ट्रवादी; दिलीप मोहितेंना बाबा काळे देणार तगडं आव्हान

पुणे: खेड आळंदी विधानसभा मतदारसंघ हा शिरूर लोकसभा मतदारसंघाचा भाग आहे. राजगुरुनगर खेड आळंदी मतदारसंघाचे मुख्यालय आहे. या मतदारसंघामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे चांगलंच वर्चस्व आहे. खेड आळंदी विधानसभा मतदारसंघाच्या राजकीय इतिहासात काँग्रेसचा मोठा प्रभाव होता. दरम्यान आत्ता या मतदारसंघाचे विद्यमान आमदार दिलीप मोहिते हे मूळचे खेड तालुक्यातील शेल पिंपळगावचे आहेत. दिलीप मोहिते पाटील यांचे १९९९ सालापासून खेड तालुक्यामध्ये वर्चस्व आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांचे दिलीप मोहिते पाटील खंदे समर्थक आहेत. मोहिते आपल्या आक्रमकतेमुळे प्रसिद्ध आहेत. दरम्यान या विधानसभा मतदारसंघात शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात सामना होणार आहे.




२००४ आणि २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप मोहिते यांनी या मतदारसंघात विजय मिळवला आणि मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचा दबदबा कायम राहिला होता. मात्र, पुन्हा एकदा २०१४ मध्ये राजकीय परिस्थिती बदलली आणि ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यातून निसटून शिवसेनेच्या सुरेश गोरे यांनी जिंकली. त्यानंतर पुन्हा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा विजय मिळवला आणि दिलीप मोहिते यांनी पुन्हा या मतदारसंघात विजय मिळवला आणि शिवसेनेचा प्रभाव कमी झाला. खेड आळंदी मतदारसंघावर आपली पकड पुन्हा मजबूत बनली आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर आता मतदारसंघात काय होईल याबाबतची उत्सुकता आहे.

# पुणे-गोरखपूर एक्सप्रेस-मधील तोतया टीसीला अटक

दौंड - पुणे -गोरखपूर एक्सप्रेस मध्ये तोतया तिकीट तपासणीस (टीसी) बनून प्रवाशांकडे पैसे वसूल करणाऱ्या तरूणास अटक करण्यात आली आहे. एक्सप्रेस मधील मुख्य तिकीट निरीक्षक यांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला.

पुणे-गोरखपूर एक्सप्रेसने दौंड कॉर्ड लाइन रेल्वे स्थानक सोडल्यानंतर सर्वसाधारण डब्यात एक साध्या वेशातील आणि चांगली शरीरयष्टी असलेला तरूण तिकीट तपासत होता. त्याने काही प्रवाशांकडून रोख रकमा घेतल्या. परंतु त्याच्या पावत्या दिल्या नाहीत. एक्सप्रेस विसापूर रेल्वे स्थानक येथे थांबली असता एक्सप्रेस मधील मुख्य तिकीट निरीक्षक शशीकांत धामणे यांनी सर्वसाधारण डब्यात प्रवेश करून तपासणी सुरू केली. तेव्हा प्रवाशांनी त्यांना एक तिकीट तपासणीस आताच तपासणी करून गेल्याचे सांगितले. तोतया तिकीट तपासणीस याने कुलदीप यादव यांच्याकडून सहाशे तर आशेराव यादव यांच्याकडून पाचशे रूपये घेतले होते. शशिकांत धामणे यांना शंका आल्याने त्यांनी पुढे जाऊन त्या तरूणाकडे ओळखपत्राची मागणी केली. परंतु त्याने ओळखपत्र नसल्याचे सांगत प्रवाशांना बाजूला करत स्वच्छतागृहात स्वतःला बंद केले. याबाबत श्री. धामणे यांनी वरिष्ठांना कळविल्यानंतर अहिल्यानगर रेल्वे स्थानकात एक्सप्रेस दाखल होताच त्या तोतया तिकीट तपासणीस यास ताब्यात घेण्यात आले. अहिल्यानगर लोहमार्ग पोलिस व रेल्वे सुरक्षा दलाने त्याच्याकडे चौकशी केली असता त्याचे नाव सचिन संजय दिवेकर (वय-२५, रा. कडेठाण, ता. दौंड) असल्याचे सांगितले. त्याच्याकडून रोख अकराशे रूपये जप्त करण्यात आले. अहिल्यानगर लोहमार्ग पोलिस ठाण्यात शशिकांत धामणे यांच्या फिर्यादीनुसार सचिन संजय दिवेकर याच्याविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम २०४ (लोकसेवक असल्याची बतावणी करून तोतयागिरी करणे) व कलम ३१८ (४ - फसवणूक करणे) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. रेल्वेचे चल तिकीट परीक्षक पांडूरंग आव्हाड, रेल्वे सुरक्षा दलाचे उप निरीक्षक विकेश तिमांडे, हवालदार जे. एस. नागुडे, अंमलदार सोमनाथ पठाडे, विठ्ठल खंडागळे, अहिल्यानगर लोहमार्ग पोलिस दलाचे अंमलदार गडाख, चव्हाण, बासोळे, आदींनी ही कारवाई केली.

## बसपाच्या राष्ट्रीय अध्यक्षा मायावती यांची पुण्यात जाहिर सभा

पुणे । प्रतिनिधी

बहुजन समाज पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा मायावती यांची महाराष्ट्रातील बसपा उमेद्वारांच्या प्रचारार्थ फुले, शाहू, आंबेडकरांची जन्मभूमी-कर्मभूमी असलेल्या पुण्यात रविवार १७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता प्रादेशिक मनोरुग्णालय, मेंटल हॉस्पिटल मैदान, इ-कॉमरझोन आयटी पार्क समोर, येरवडा जाहीर सभा होणार आहे. बसपा राज्यात २३७ ठिकाणी स्वबळावर ताकदीनिशी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक लढवित आहे.



या वेळी महाराष्ट्राच्या विधानसभेत बसपाचे खाते खुलेल व बसपा बॅलन्सिंग पॉवर म्हणून महाराष्ट्रात उभारेल असा आमचा विश्वास आहे. बसपा ही निवडणूक मते खाण्यासाठी नसून निवडणूक जिंकण्यासाठी लढवित असल्याचे प्रदेश सचिव सुदिप गायकवाड, पुणे जिल्हा प्रभारी मोहम्मद शफी आणि जिल्हा अध्यक्ष दिलीप कुसाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## ऋषिराज पवार अपहरण, खंडणी प्रकरणातील आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ

शिरूर-हवेलीचे आमदार व महाविकास आघाडीचे उमेदवार अशोक पवार यांचे पुत्र, घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ऋषिराज अशोक पवार यांचे दि. ९ नोव्हेंबर रोजी अपहरण करून त्यांची महिलेसोबत अश्लील छायाचित्रे, व्हिडीओ चित्रित केले आणि ते व्हायरल करण्याची धमकी देत १० कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचे प्रकरण खरे आहे. या प्रकरणी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्यावर आणखी एक गुन्हा दाखल झाला असून २ दिवसांची पोलीस कोठडी वाढविल्याची माहिती शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली. भाऊसाहेब विरा कोळपे (वय ३०), मयूर संजय काळे (वय २४) आणि तुषार संजय कुंभार (वय २१) अशी अटक करण्यात आलेल्या तिघा आरोपींची नावे आहेत. तर संशयित महिला आरोपी पसार झाली आहे. याप्रकरणी ऋषिराज अशोक पवार यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



# सोयाबीनला ७ हजार रुपये दर देणार : मल्लिकार्जुन खर्गे

पुणे; : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत जनतेला आम्ही दिलेली पंचसुत्री आम्ही नक्की पूर्ण करु. आम्ही आमच्या सर्व गॅरंटी पूर्ण करू. त्याचबरोबर आम्ही सोयाबीनला ७ हजार रुपये दर देणार आहोत, असे आश्वासन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी (दि.१४) येथे दिले. ते पुण्यात आले असता पत्रकार परिषदेत बोलत होते.



राज्याच्या निवडणुकीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पंतप्रधान आणि गृहमंत्री फिरतायेत, हे मी माझ्या राजकीय कारकिर्दीत आतापर्यंत कधी पाहिले नाही. मोदी आणि शहा घरोघरी फिरुन काँग्रेसला शिव्या घालत आहेत. मोदी फक्त गांधी फॅमिलीला शिव्या घालण्याचे काम करत आहेत. ते शेतकरी, शेती, उद्योग, रोजगार यावर का बोलत नाही? असा सवाल खर्गे यांनी केला. लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी पंतप्रधान होतील म्हणून मोदी त्यांना शिव्या घालत होते, हे ठीक आहे. पण महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणुकीचा आणि गांधी कुटुंबाला शिव्या घालण्याचा काय संबंध आहे का?, असा सवाल करून महाराष्ट्रात काही राहुल गांधी मुख्यमंत्री बनणार नाहीत . किंवा मोदी मुख्यमंत्री बनणार नाहीत, असा टोला खर्गे यांनी लगावला. काँग्रेस जम्मू काश्मीरमध्ये ३७० कलम परत आणणार, असे खोट भाजप पसरवत आहे. कोण असे म्हटले ते दाखवा. ते मात्र भाजप सांगत नाही. देशाची एकता, स्वातंत्र्य लढा आणि गरीबांसाठी भाजप कधी लढली नाही, असे खर्गे म्हणाले.